| लातूर | वर्ष ३५ वे | अंक ३६ वा | मंगळवार, दिनांक २१ एप्रिल २०२६ | पृष्ठे ६ | किंमत १ रू. RNI 47034/64

# लातूर समाचार

LATUR SAMACHAR
Email-dainiklatursamachar@gmail.com
(सांज दैनिक)
प्रकाशन: लातूर
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26
संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक) कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

# माजी खा. डॉ. गोपाळराव पाटील यांचे निधन; लातूरमध्ये शोककळा

**लातूर/प्रतिनिधी :** समाजसेवा, वैद्यकीय क्षेत्र आणि शिक्षण क्षेत्रात मोठे योगदान देणारे माजी खासदार डॉ. गोपाळराव पाटील यांचं मंगळवारी सकाळी निधन झाले. गेल्या पंधरा दिवसांपासून ते आजारी होते. लातूरमधील गॅलेक्सी हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू असताना त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या निधनाने लातूरसह संपूर्ण मराठवाड्यात हळहळ व्यक्त होत आहे.

थोडक्यात जीवनगाथा....

लातूर म्हटले की पटकन दोन नावे समोर येतात. पहिलं माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांचे आणि दुसरे म्हणजे राजर्षि शाहू महाविद्यालय! वैद्यकीय, अभियांत्रिकी अभ्यासक्रमांना प्रवेशासाठी या महाविद्यालयाची राज्यभरात ख्याती आहे. राज्यात शिक्षणाचा 'लातूर पॅटर्न' याच महाविद्यालयामुळे नावारूपाला आला. बारावीच्या निकालात या महाविद्यालयाचा राज्यभरात दबदबा आहे. त्यामुळे या महाविद्यालयात प्रवेशासाठी विद्यार्थ्यांची झुंबड उडते. याचे प्रणेते डॉ. गोपाळराव पाटील होय!



उस्मानिया विद्यापीठातून एमबीबीएस, डीसीएच केलेल्या आप्पांनी कर्नूलसह कोल्हापूर जिल्ह्यातील कुरुंदवाडला वैद्यकीय अधिकारी म्हणून काम केले. नंतर ते लातूर येथे आले आणि वैद्यकीय व्यवसायात स्थिरावत अवघ्या लातूर जिल्ह्याचे आप्पा बनले. वैद्यकीय, शैक्षणिक क्षेत्रात नाव लौकिक प्राप्त केल्यानंतर आप्पांनी चारित्र्य संपन्न राजकीय नेते, अशीही स्वतःची ओळख निर्माण केली.

डॉ. गोपाळराव पाटील हे मूळचे धाराशिव जिल्ह्याच्या उमरगा तालुक्यातील कवठा गावाचे रहिवासी आहेत. दिवंगत माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांचे ते चुलत मामा. असे असले तरी डॉ. पाटील हे सुरुवातीपासूनच भाजपमध्ये आहेत. व्यवसायाने बालरोगतज्ज्ञ असलेल्या डॉ. पाटील यांनी रुग्णसेवेतही स्वतःची वेगळी ओळख निर्माण केलेली आहे. गोपाळराव पाटील यांचा जन्म ३ ऑक्टोबर १९३१ रोजी झाला..

डॉ. पाटील यांनी लातूर लोकसभा मतदारसंघातून चार वेळेस निवडणूक लढवली, मात्र ते विजयी होऊ शकले नाहीत. चारही निवडणुकींमध्ये देशाचे माजी गृहमंत्री दिवंगत शिवराज पाटील चाकूरकर यांच्याकडून त्यांना पराभव स्वीकारावा लागला. विशेष म्हणजे, त्यावेळी उमरगा तालुका हा लातूर लोकसभा मतदारसंघाला जोडलेला होता. डॉ. पाटील यांचं कवठा गाव लातूर लोकसभा मतदारसंघातच होते.

लोकसभेच्या सलग चार निवडणुकांमध्ये पराभूत झाले तरी डॉ. पाटील हे भाजपसाठी महत्वाचे नेते आहेत. मराठवाड्यात त्या काळात काँग्रेसचा जोर होता. लातूर जिल्ह्यात माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख, माजी मुख्यमंत्री डॉ. शिवाजीराव पाटील निलंगेकर यांच्यासारखे काँग्रेसचे दिग्गज नेते होते. अशा काळात भाजपला रुजवण्यात डॉ. पाटील यांचा मोठा पुढाकार होता. त्यामुळेच पक्षानं त्यांना राज्यसभेवर संधी दिली होती.

कवठा येथील आध्यात्मिक, परोपकारी कुटुंबात गोपाळराव यांचा ३ ऑक्टोबर १९३१ रोजी जन्म झाला. तेरणा नदीकाठावर वसलेल्या या गावाला ऐतिहासिक वारसा आहे. गावात प्राचीन काळातील मंदिरं आहेत. गोपाळराव यांचे वडील विठ्ठलराव पाटील यांना समाजात मान होता, तो त्यांच्या दानशूर वृत्तीमुळे. शालेय जीवनातच गोपाळराव यांची चौकस बुद्धी, त्यांच्या हुशारीची चुणूक दिसून आली होती. संयुक्त कुटुंबात वाढल्यामुळे त्यांच्या अंगी समंजसपणाही वाढत गेला. आठ, नऊ वर्षांच्या वयातच त्यांना संस्कृत श्लोक तोंडपाठ झाले होते.

पुढे विठ्ठलराव यांनी गोपाळराव यांच्यासह आपल्या तिन्ही मुलांना शिक्षणासाठी लातूर येथे ठेवले. त्यासाठी त्यांनी भाड्याने एक घर घेतले होते. मारवाडी राजस्थान विद्यालयात गोपाळराव यांचे शिक्षण सुरू झाले. तेथे त्यांनी अल्पावधीत शिक्षकांची मने जिंकली. काही अडचणींमुळे गोपाळराव आणि त्यांच्या भावंडांना नंतर बाभळगाव येथे नातेवाईकांकडे राहावे लागले. तेथून शाळेसाठी ते लातूरला ये-जा करत असत. शिक्षक सेवा वृत्तीने काम करण्याचा तो काळ होता.

शिक्षक विद्यार्थ्यांकडे वैयक्तिक लक्ष द्यायचे, त्यांच्यातील गुण हेरायचे, त्यांच्या आवडी निवडी जाणून घ्यायचे आणि ते गुण विकसित करण्यासाठी प्रयत्न करायचे. यातूनच गोपाळराव हे इंग्रजी विषयात निपुण झाले. ते अत्यंत हुशार असल्यामुळे त्यांना पाचवीतून थेट सातवीत प्रवेश देण्याचा निर्णय घेण्यात आला होता, मात्र गोपाळराव यांनी त्याला नम्रपणे नकार दिला होता,

वैद्यकीय शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांनी हैदराबाद परिसर आणि कोल्हापूर जिल्ह्यातील कुरुंदवाड येथे काही वर्षे शासकीय वैद्यकीय अधिकारी म्हणून काम केले. १९६५ मध्ये शासकीय नोकरीचा राजीनामा देऊन त्यांनी गाव जवळ केले, म्हणजे ते लातूरला आले. लातूर येथे त्यांनी वैद्यकीय व्यवसाय सुरू केला. प्रदीर्घ वैद्यकीय सेवेत त्यांनी रुग्णांना शक्यतो ॲडमिट करून घेतलेच नाही, आजारी मुलांवर परिपूर्ण उपचार करण्याची काळजी त्यांनी नेहमीच घेतली.

गोरगरीबावर उपचार करणारे व अल्प फी घेणारे डॉक्टर नव्हतेच तर ते एक देवच होते. अनेक बालाकावर मोफत उपचार केला. ॲडमिट करून घेणे हा त्यांचा स्वभाव नव्हता. जे काही उपचार घरीच करायाला सांगून वैद्यकिय ज्ञान घरातल्या मिळत असत व रुग्ण बरा होत असत. त्यांचे निधन म्हणजे वैद्यकिय क्षेत्रातील निस्वार्थीपने सेवा देणाऱ्या डॉक्टरांना कायम मुकलो ही खंत कायम मनात राहणारी आहे. त्यांना भावपुर्ण श्रद्धांजली!

## निस्पृह सेवाव्रती काळाच्या पडद्याआड

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची माजी खासदार डॉ गोपाळराव पाटील यांना श्रद्धांजली

**मुंबई/प्रतिनिधी :** वैद्यकीय सेवा, शिक्षण क्षेत्रातील निस्पृह सेवाव्रती काळाच्या पडद्याआड गेला आहे. अशी शोकभावना व्यक्त करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लातूर येथील शिवछत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आणि संस्थापक, ज्येष्ठ बालरोगतज्ञ, माजी खासदार डॉ. गोपाळराव पाटील यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे.



'डॉ गोपाळराव पाटील यांना आपल्या परिसराविषयी मोठी तळमळ होती. ते व्यवसायाने बालरोग तज्ज्ञ होते पण ग्रामीण भागात चांगल्या शैक्षणिक सुविधा निर्माण व्हाव्यात यासाठी ते सदैव प्रयत्नशील राहिले. वैद्यकीय क्षेत्रातही त्यांनी भरीव असे योगदान दिले. बालरोग तज्ज्ञांच्या संघटनात्मक बांधणीत त्यांचे मोलाचे योगदान राहिले. या क्षेत्रातील नवनवीन संशोधन, ज्ञान तंत्रज्ञानाचा रुग्णांना लाभ व्हावा यासाठी ते प्रयत्नशील राहिले. लातूरला शिवछत्रपती शिक्षण संस्था स्थापन करून, त्याअंतर्गत त्यांनी अनेक उपक्रम यशस्वीपणे राबविले. या संस्थेच्या राजर्षी शाहू महाविद्यालयाने डॉ पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली गुणवत्तेच्या जोरावर देशभरात ओळख निर्माण केली. डॉ पाटील यांनी भारतीय जनता पार्टीच्या वतीने राज्यसभा सदस्यत्वाची संधी मिळाली. राज्यसभेच्या माध्यमातून त्यांनी वाणिज्य, परराष्ट्र व्यवहार, रेल्वे या महत्त्वाच्या विषय समित्यांवर काम केले. डॉ पाटील यांनी महाराष्ट्राच्या समाजकारण - राजकारणात निस्पृहपणे कार्य करण्याचा मानदंड निर्माण केला. त्या अर्थाने ते निरंतर सेवाव्रती होते. डॉ पाटील यांच्या निधनाने राज्याच्या वैद्यकीय सेवा, सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्राची हानी झाली आहे. पाटील कुटुंबीयांसह, त्यांच्या कार्यात सहभागी कार्यकर्त्यांवर दुःखाचा आघात झाला आहे. या सर्वांच्या दुःखात आम्ही सहभागी असून ईश्वराने त्यांना हा आघात सहन करण्याची ताकद द्यावी अशी प्रार्थना करून मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस यांनी माजी खासदार डॉ गोपाळराव पाटील यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे.

## डॉ. गोपाळराव पाटील यांच्या पार्थिव देहाचे माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांनी घेतले दर्शन



**लातूर/प्रतिनिधी :** लातूरचे माजी खासदार तथा शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आदरणीय डॉ गोपाळराव पाटील यांचे मंगळवारी सकाळी आठ वाजता दुःखद निधन झाल्याची बातमी कळताच राज्याचे माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख साहेब यांनी गोपाळराव पाटील यांच्या जुना औसा रोड येथील निवासस्थानी जाऊन गोपाळराव पाटील यांचे पार्थिव देहाचे अंतिम दर्शन घेतले त्यांना पुष्पहार घालून आदरांजली वाहिली

यावेळी विनायकराव पाटील कवठेकर शहाजी पाटील, सच्चीदानंद पाटील, राज्य साखर महासंघाचे उपाध्यक्ष आबासाहेब पाटील जागृती शुगर चे उपाध्यक्ष लक्ष्मणराव मोरे तसेच पाटील कुटुंबातील सदस्य उपस्थित होते.

## लातूरच्या शैक्षणिक क्रांतीचा महामेरू हरपला!

**मुंबई/प्रतिनिधी :** लातूर येथील शिवछत्रपती शिक्षण संस्थेचे संस्थापक, बालरोगतज्ज्ञ आणि माजी खासदार आदरणीय डॉ. गोपाळराव पाटील यांच्या निधनाचे वृत्त अत्यंत दुःखद आहे. त्यांच्या जाण्याने केवळ लातूर जिल्ह्याचेच नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्राच्या शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्राचे कधीही न भरून येणारे नुकसान झाले आहे.



डॉ. गोपाळराव पाटील यांनी वैद्यकीय व्यवसायाच्या माध्यमातून जनसेवा करतानाच, शिक्षणाचे महत्त्व ओळखून लातूरमध्ये शिवछत्रपती शिक्षण संस्थेची मुहूर्तमेढ रोवली. त्यांच्या मार्गदर्शनाखालील राजर्षी शाहू महाविद्यालयाने 'लातूर पॅटर्न'च्या माध्यमातून राज्याला आणि देशाला अनेक गुणवंत विद्यार्थी दिले. लातूरची शैक्षणिक ओळख राष्ट्रीय स्तरावर पोहोचवण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे, यासाठी त्यांनी प्रयत्न केले.

राज्यसभेचे सदस्य म्हणून काम करताना त्यांनी वाणिज्य, परराष्ट्र व्यवहार आणि रेल्वे यांसारख्या महत्त्वपूर्ण समित्यांवर आपल्या अभ्यासू वृत्तीचा ठसा उमटवला. एक मृदूभाषी, संयमी आणि विकासाची दृष्टी असलेले बहुआयामी व्यक्तिमत्व म्हणून ते सदैव स्मरणात राहतील.

डॉ. गोपाळराव पाटील यांच्या निधनामुळे आपण एका मार्गदर्शकाला मुकलो आहोत. मी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो आणि हे दुःख सहन करण्याची शक्ती त्यांच्या परिवारास मिळो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना !

विनम्र अभिवादन!

**–ना. शिवेंद्रसिंहराजे भोसले**
**पालकमंत्री, लातूर जिल्हा.**

रोज वाचा
ऑनलाईन
लातूर समाचार
www.latursamachar.com

## पतीपत्नीचा वाद टोकाला; मातेने दोन चिमुकल्यांसह विहिरीत जीवन संपविले

### औसा तालुक्यातील खरोसा येथे हृदयद्रावक घटना

औसा : तालुक्यातील खरोसा येथे अत्यंत हृदयद्रावक घटना घडली. एका विवाहितेने कौटुंबिक कारणातून आपल्या दोन चिमुकल्या मुलांसह विहिरीत उडी घेऊन जीवन संपविल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. या घटनेने परिसरात शोककळा पसरली आहे. निकिता अमरदीप भूरे (वय २५) असे मृत महिलेचे नाव असून तिच्यासोबत तिची मुलगी शिवानी आणि मुलगा शिवांश यांचाही दुर्दैवी मृत्यू झाला आहे. ही घटना त्यांच्या घराशेजारील विहिरीत घडल्याचे समजते.

पती-पत्नीचा घरगुती वाद टोकाला गेला आणि काळीज पिळवटून टाकणारी घटना औसा तालुक्यातील खरोसा येथे घडली. रविवारी (दि.१९) संध्याकाळपासून मध्यरात्रीपर्यंत पती-पत्नीमध्ये वाद सुरू होते. त्यानंतर रात्री दीड वाजण्याच्या



सुमारास निकिता भुरे या आपल्या दोन्ही मुलांना घेऊन घराबाहेर पडल्या. सकाळी त्या तिघांचा शोध घेण्यात आला, मात्र काहीच ठावठिकाणा लागला नाही. अखेर दुपारनंतर घराशेजारील विहिरीत तिघांचे मृतदेह आढळून आल्याने परिसरात एकच खळबळ उडाली.

या दुर्दैवी घटनेमुळे खरोसा गावासह परिसरात शोककळा पसरली असून नागरिकांकडून हळहळ व्यक्त केली जात आहे. पती - पत्नीच्या कौटुंबिक वादाच्या पार्श्वभूमीवर एका विवाहितेने हे टोकाचे पाऊल उचलल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे.

घटनेची माहिती मिळताच किल्लारी पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. स्थानिक नागरिकांच्या मदतीने विहिरीतून तिघांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले असून पंचनामा करून पुढील कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. या दुर्दैवी घटनेमुळे संपूर्ण खरोसा परिसर शोकमग्न झाला आहे. नागरिकांकडून हळहळ व्यक्त केली जात आहे.

## कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



निवडणुकीपूर्वी मोफत घोषणा या संदर्भाने SC ची केंद्र शासन व निवडणूक आयोग, मुख्य लेखापाल यांना नोटीस

## चिमटा दयाचा



रस्त्यावरील कॅमेऱ्याला स्पीड, बेल्ट आदि दिसते ! ऑनलाईन दंडाची सूचना येते !! तोच खराब रस्ता, खड्डे, वळणावरील झाडे आदी का दिसत नाहीत ?

## लातूर–पुणे प्रवाशांसाठी आनंदाची बातमी; 'मेमू' रेल्वे गाडीचा सोलापूर मध्य रेल्वे विभागा कडून प्रस्ताव सादर

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर ते पुणे प्रवास करणाऱ्या प्रवाशांसाठी मोठा दिलासा देणारी बातमी समोर येत आहे. सोलापूर मध्य रेल्वे विभागाकडून लातूर-पुणे दरम्यान प्रायोगिक तत्त्वावर 'मेमु' (MEMU) रेल्वे गाडी सुरू करण्याचा प्रस्ताव रेल्वे बोर्ड कडे पाठवला आहे, अशी माहिती मध्य रेल्वे सोलापूर विभाग चे वरिष्ट वाणिज्य व्यवस्थापक जयदीप प्रदक्षिणे यांनी दिली.

सोलापूर येथे नुकत्याच पार पडलेल्या विभागीय बैठकीत लातूर-पुणे मेमो गाडीचा प्रस्ताव मांडण्यात आला होता.यामुळे लातूर ते पुणे प्रवास अधिक जलद आणि सोयीस्कर होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

हि बैठक विभागीय रेल्वे व्यवस्थापक डॉ. सुजित मिश्रा यांची प्रमुख उपस्थिती पार पडली. या बैठकी मधे विभागीय सल्लागार समिती सदस्य संजय निलेगावकर यांनी हरंगुळ-हडपसर गाडी क्र. ११४२९/३० रेल्वे गाडी खडकी स्टेशन किंवा पुणे स्टेशनपर्यंत वाढवण्याची मागणीही केली. सध्या हडपसरहून पुणे शहरात जाण्यासाठी प्रवाशांना खासगी वाहनांवर अवलंबून राहावे लागते, ज्यामुळे ३०० ते ४०० रुपयांपर्यंत अतिरिक्त खर्च करावा लागतो. ही गैरसोय टाळण्यासाठी रेल्वे सेवा वाढविण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली.





याचबरोबर बैठकीत मुंबई-हैदराबाद स्लीपर वंदे भारत रेल्वे लातूर मार्गे सुरू करावी, नांदेड-हडपसर गाडी क्र. १७६२९/३० ट्रेन खडकी स्टेशन पर्यंत वाढवावी, तसेच लातूर रेल्वे स्थानकावरील पिट लाईन व प्लॅटफॉर्म क्रमांक ३ व ४ चे काम, हरंगुळ रेल्वे स्थानकावरील प्लॅटफॉर्मची उंची वाढवणे रुंदी वाढवणे व घरणी येथील क्रॉसिंग स्टेशन चे काम लवकर पूर्ण करावे, अशा विविध मागण्याही मांडण्यात आल्या.

दरम्यान, लातूर-पुणे मेमू रेल्वेचा प्रस्ताव फेब्रुवारी महिन्यात रेल्वे मुख्यालयाकडे पाठविण्यात आला असून त्याची व्यवहार्यता तपासणीही करण्यात आली आहे, अशी माहिती सोलापूर विभागाचे वरिष्ठ वाणिज्य व्यवस्थापक जयदीप प्रदक्षिणे यांनी दिली.

'मेमू' (चरळप डळपश एश्रशलींळल चीश्रींळश्रिश णपळीं) या गाड्या प्रामुख्याने कमी ते मध्यम अंतराच्या प्रवासासाठी वापरल्या जातात आणि निमशहरी व ग्रामीण भागांना जोडण्याचे काम करतात.

लातूर-पुणे मार्गावर आणखी एक रेल्वे उपलब्ध झाल्यास जिल्ह्यातील प्रवाशांची मोठी सोय होणार असून, दैनंदिन प्रवास अधिक जलद, किफायतशीर आणि सुरक्षित होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## अमेरिकेचे प्रेम पाकिस्तानवर!

जगात अमेरिका हा देश वरचढ होण्याच्या प्रयत्नात आहे. ईस्त्राईलच्या हाताशी धरून तो ईराणवर हल्ला केला आहे. आज पर्यंत अमेरिकने युद्धाचा वापर इतर देशाचा केला आहे. आपल्या भुमिचा वापर कदापी केला नाही. नुकसान करून घेतले नाही, विचार केला तर जे काही युद्धात नुकसान झाले ते इस्त्राईल व इराणचे आहे. अमेरिकेचे सैन्य तेही हवाई मिसाईलचा वापर केला आहे. इराणे देखिल मोठ्या प्रमाणात इस्त्राईलवर मिसाईल डागले आहेत. नुकसान इस्त्राईल व इराणचे झाले आहे. युद्धावर तोडगा पाकिस्तानात काढला जात आहे. आज पाकिस्तानची आर्थिक स्थिती भयाण आहे. अमेरिका आर्थिक मदत करीत आहे. अमेरिका हा स्वार्थापोटी पाकिस्तानचा वापर करीत आहे हे लक्षात येत नाही. एखादे वेळी पाकिस्तान गिळंकृत करण्याचा प्रयत्न ट्रम्प यांच्याकडून होवू शकतो. आज पर्यंत काय केले तर इराणच्या आजूबाजूचे लहान देश आहेत त्याला आपल्याशी प्रथम केले. त्यांना आर्थिक मदत केली. आता त्यांचा वापर इराणच्या विरोधात केला जात आहे. जे काही युद्धात नुकसान झाले ते इस्त्राईल व इराणसह त्याच्या जवळच्या राष्ट्राचे झाले आहे. तसे आलिकडे युद्ध कोणात्याच देशाला परवडणारे नाही. मिसाईल युद्ध परवडणारे नाही. महागडी मिसाईल आहेत. विध्वंसक आहेत. हे मान्यच केले पाहिजे. आता समोरासमोर लढण्याची क्षमता उरली नाही. हवाईयुद्ध अधिक प्रमाणात केले जात आहे. युद्धाच्या स्थितीत माहिती असताना मध्यस्य पाकिस्तान काम पाहात आहे. आपल्या विचाराचा व आपल्या वंशाचे अधिक ईराणमध्ये असताना त्यांची हानी अमेरिका करीत आहे, त्या अमेरिकेला पाकिस्तान मदत करीत आहे. वास्तविक सर्वाधिक आर्थिक हानी इराणची झाली आहे. अनेक शहरे उद्धस्थ केली आहेत. अशा स्थितीत पाकिस्तानची मध्यस्थी अतिशहाणपनाची आहे. जो अमेरिका कोणाचे एकत नाही, आपल्याच मनाचे करतो अशा ट्रम्पची माहिती असताना पाकिस्तानची लुडबुड कुचकामी होण्याची शक्यता आहे. पाकिस्तान हे ईस्लामिक राष्ट्र आहे. तरी अमेरिकेच्या सानिध्यात येणे म्हणजे मुर्खपनाचे लक्षण आहे. तसे पाहिले तर पाकिस्तानजवळ अमेरिका जवळ येणे म्हणजे भारताला एक प्रकारे धोक्याची घंटा आहे. आज पर्यंत ज्या देशाचा काटा काढायाचा त्या देशाशी शत्रुत्व असणाऱ्या देशाशी मैत्री अमेरिकेने केली आहे. त्याच प्रमाणे शेजारी राष्ट्राचा उपयोग युद्धासाठी म्हणजे आपला स्वार्थ साधण्यासाठी केला आहे हे सर्वांना कळाले आहे. भारताने ईस्त्राईल-इराण दरम्यान युद्ध चाले आहे तसे सावध प्रतिक्रिया देत आहे. मुळात दोन्ही देश धर्मवेडी आहेत. धर्माच्या आडून हिंसा घडविणे हा त्यांचा उद्देश आहे हे अनेक बाबीवरून लक्षात येते. भारताने आज पर्यंत मानवतेच्या दृष्टिने मदतच केली आहे. इराणाला उपचारार्थ औषधाचे हवाईजहाज पाठविले आहे. मानवतेच्या दृष्टिने भारताने मदत केली आहे. तसे पाकिस्तानचे योगदान काय आहे? अमेरिका हा पाकिस्तानावर दबाब निर्माण करून भारताला शह देण्याचा प्रयत्न असू शकतो. त्यामुळे भारताने शांत राहून पाकिस्तान हा जगाच्या नकाशावरून समाप्त केला पाहिजे. पाकिस्तानहा भारताचा शस्त्रुराष्ट्र आहे. याचाच फायदा घेण्याचा अमेरिकेचा डाव आहे. एका दगडात दोन पक्षी मारण्याचा कपटी हेतू अमेरिकेचा आहे हे भारतीयांनी ओळखले पाहिजे. इराणची स्थिती युद्धामुळे बिघडली आहे. तसे पाहिले तर अमेरिकेलाच युद्ध संपवावे लागेल. अधिक झळ अमेरिकेला पोंहचत आहे. एक-एक मिसाईल मोठ्या किंमतीचे आहे. ते परवडणारे नाही हे ओळखले जात असले तरी इराण हा एकटा अमेरिकेशी लढत आहे. आतून तो कोणाची मदत घेत आहे हे उघड झाले नसले तरी मोठ्या हिंमतीने अमेरिका म्हणजे इस्त्राईलशी दोन हात करीत आहे. ईस्त्राईलची स्थिती भयाण आहे. इराणच्या छोट्या मिसाईलने नुकसान मोठे केले आहे. तसे पाहिले तर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दावा केला आहे की, इराण आपला समृद्ध युरेनियमचा साठा अमेरिकेला सोपवण्यासाठी तयार झाला आहे. याचा वापर अणुबॉम्ब बनवण्यासाठी होऊ शकतो. असा करार झाला तर तेलाचा पुरवठा सुरू होईल, होर्मुझची सामुद्रधुनी खुली राहील आणि परिस्थिती सामान्य होईल. त्यांनी हे देखील सांगितले की, जर करार इस्लामाबादमध्ये झाला तर ते पाकिस्तानला भेट देऊ शकतात. मात्र, इराणी माध्यमांनी ट्रम्प यांचा दावा चुकीचा ठरवला आहे आणि म्हटले आहे की, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष हवेत किल्ले बांधत आहेत तसे पाहिले तर इराण हा कमी नाही. इराण अणुबॉम्ब बनवण्याच्या खूप जवळ आहे. युरेनियम एक असा पदार्थ आहे, ज्यापासून अणुऊर्जा आणि अणुबॉम्ब दोन्ही बनवता येतात. फरक फक्त या गोष्टीने पडतो की त्याला किती एनरिच म्हणजेच शुद्ध केले आहे. नैसर्गिक युरेनियममध्ये कामाचा भाग खूप कमी असतो, त्यामुळे त्याला मशीन (सेंट्रीफ्यूज) द्वारे स्टेप बाय स्टेप शुद्ध केले जाते. याच प्रक्रियेला 'युरेनियम एनरिचमेंट' म्हणतात. सध्या १२० ते १३० किलोग्रामच्या आसपास ६0% पर्यंत एनरिच्ड केले गेले आहे. जर हे एनरिचमेंट ९0% पर्यंत केले गेले, तर त्यातून अणुबॉम्ब बनवता येऊ शकतो. त्यामुळे अमेरिका आणि इस्रायल इराणवर अणुकार्यक्रम मर्यादित ठेवण्यासाठी आणि एनरिच्ड युरेनियम सोपवण्यासाठी दबाव टाकत आहेत. हे पाकिस्तानला कळत नाही. जागतिक शांतता राहावी असे वाटत असेल तर युरेनियमचा करार अमेरिकेशी होवू न देणे ही पाकिस्तानची जबाबदारी आहे. अमेरिका धुर्त आहे त्यामुळे सर्व राष्ट्र एकाछत्र छायेखाली येवून हा करार कोणत्याही परिस्थितीत होवू नये असे काम केले पाहिजे. विध्वंसक करार व्हावा असे पाकिस्तानला वाटत असेल तर जगाने पाकिस्तानवर बहिष्कार घालावा. कोणतीही मदत केली जावू नये. मुळात अमेरिकेचा डाव हा ईस्त्राईलच्या खांद्यावर बंदुक ठेवुन चाल खेळण्याची व युरेनियमसाठ्यावर कब्जा करण्याचा डाव आहे. अशा धुर्तपनामुळे अमेरिकेचे पाकिस्तानवर प्रेम आहे हे लक्षात घेतले पाहिजे. भारताला शह देण्यासाठी हा अमेरिकेचा डाव असू शकतो हे विसरता येत नाही. त्यामुळे जागतिक शांततेसाठी सर्व देशांनी अमेरिकेपेक्षा पाकिस्तानला फटकारले पाहिजे, तरच जगात शांतत नांदेल.

# मध्य रेल्वेने हेरिटेज वॉक, प्रदर्शने आणि इतर कार्यक्रमांसह जागतिक वारसा दिन २०२६ साजरा केला



**मुंबई/प्रतिनिधी :** मध्य रेल्वेने जागतिक वारसा दिन-२०२६ मोठ्या उत्साहात साजरा केला. हा कार्यक्रम युनेस्कोचे जागतिक वारसा स्थळ व मध्य रेल्वेचे मुख्यालय आणि भारतीय रेल्वेचा अभिमान असलेल्या तसेच गेल्या १३८ वर्षांपासून दिमाखाने उभे असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे साजरा झाला. सांस्कृतिक वारशाचे महत्त्व आणि त्याच्या जतनाची गरज याबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी इंटरनॅशनल कौन्सिल ऑन मॉन्युमेंट्स अँड साइट्स () ने दरवर्षी १८ एप्रिल रोजी जागतिक वारसा दिनाची सुरुवात केली. ने प्रस्तावित केल्यानुसार, २०२६ ची संकल्पना ''संघर्ष आणि आपत्तींच्या संदर्भात अस्तित्वातील वारशासाठी आपत्कालीन प्रतिसाद'' ही आहे.
या कार्यक्रमाचा एक भाग म्हणून, मध्य रेल्वेचे अतिरिक्त महाव्यवस्थापक श्री प्रतीक गोस्वामी यांनी, प्रधान मुख्य यांत्रिक अभियंता श्री सुबोध कुमार सागर आणि मुख्यालय व मुंबई विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांसह 'हेरिटेज वॉक'चे नेतृत्व केले. या पदयात्रेत छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसच्या स्थापत्यकलेतील भव्यतेवर प्रकाश टाकण्यात आला आणि भारतीय रेल्वेच्या समृद्ध वारशाचा गौरव करण्यात आला. विविध क्षेत्रांतील लोक, नागरी संरक्षण दलाचे सदस्य, स्काऊट्स अँड गाईड्स आणि मोठ्या संख्येने रेल्वे कर्मचारी यांनीही या पदयात्रेत सक्रियपणे सहभाग घेतला. 'हेरिटेज वॉक'ची सुरुवात मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथील फलाट क्रमांक १४ आणि १५ च्या दरम्यान असलेल्या हेरिटेज सहयोगी मधील प्रदर्शनाला भेट देऊन झाली. यामध्ये छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस इमारतीची स्थापत्यकलेतील अद्भुतता दर्शवणारे डिस्प्ले बोर्ड, रेल्वे स्थानके, रेल्वे पूल आणि नेरळ-माथेरान रेल्वेवरील लघुपट, तसेच जुन्या रेल्वे इंजिन आणि डब्यांच्या प्रतिकृतींसह विविध प्रदर्शने होती. हेरिटेज गॅलरीच्या भिंती महाराष्ट्रातील रेल्वे, ऐतिहासिक इमारती आणि पर्यटन स्थळांच्या छायाचित्रांनी सजवल्या होत्या. या प्रदर्शनात पूर्णपणे रेल्वेच्या निरुपयोगी टाकाऊ सामानापासून बनवलेला महात्मा गांधींचा पुतळाही होता. 'हेरिटेज वॉक'मध्ये हेरिटेज संग्रहालय आणि स्टार चेंबरलाही भेट देण्याचा समावेश होता.

अतिरिक्त महाव्यवस्थापकांनी अधिकारी, रेल्वे कर्मचारी आणि उपस्थित असलेल्या सर्वांना वारसा रेल्वे स्थानके, लोकोमोटिव्ह यांचे संरक्षण करण्याची, रेल्वे वारशाबद्दल जागरूकता वाढवण्याची आणि वारसा संवर्धनाची भावना जपण्याची शपथ दिली.

या कार्यक्रमाचा एक भाग म्हणून जागतिक वारसा दिनाच्या पूर्वसंध्येला छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस या वारसा इमारतीला रोषणाई करण्यात आली.

मध्य रेल्वेचा समृद्ध वारसा एक दृष्टिक्षेप छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, जे युनेस्कोचे जागतिक वारसा स्थळ आहे, ही एक स्थापत्यशास्त्रीय अद्भुत वास्तू आहे. ब्रिटिश अभियंता फ्रेडरिक विल्यम स्टीव्हन्स यांनी डिझाइन केलेली ही इमारत इंडो-गॉथिक स्थापत्यकलेचे एक उत्कृष्ट उदाहरण आहे. याचे बांधकाम १८७८ मध्ये सुरू झाले आणि १८८८ मध्ये ₹१६,१३,८६३ च्या खर्चाने पूर्ण झाले. ही इमारत व्हिक्टोरियन गॉथिक रिवाइव्हल शैलीला मुघल आणि पारंपरिक भारतीय स्थापत्यकलेच्या घटकांसह जोडते, जे भारताच्या समृद्ध आणि विविध वारशाचे प्रतीक आहे.

भारतातील सर्वात जुन्या अस्तित्वात असलेल्या रेल्वे स्थानकांपैकी एक असलेले भायखळा स्टेशन, १६ एप्रिल १८५३ रोजी बोरीबंदर ते ठाणे या पहिल्या ऐतिहासिक रेल्वे प्रवासाचा एक भाग होते. आता १७३ वर्षे जुने असलेले हे स्टेशन, त्याच्या मूळ गॉथिक वास्तुकलेच्या वैभवात अत्यंत काळजीपूर्वक पुनर्संचयित करण्यात आले आहे आणि त्याचे मोठ्या काळजीने जतन केले जात आहे.

११९ वर्षे जुनी वारसा रेल्वे लाईन, नेरळ-माथेरान लाईट रेल्वे, १९०७ मध्ये सुरू झाली. ही निसर्गरम्य नॅरो-गेज रेल्वे प्रौढ, मुले आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी एक आनंददायी अनुभव आहे. ही रेल्वे प्रवाशांना घनदाट जंगले आणि डोंगराळ प्रदेशातून एक अनोखा प्रवास घडवते, तसेच जुन्या रेल्वे प्रवासाचे आकर्षण जपते.

जागतिक वारसा दिनानिमित्त मध्य रेल्वेच्या सर्व विभागांमध्ये आणि कार्यशाळांमध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

मध्य रेल्वे, प्रगतीशील भविष्यासाठी आधुनिकीकरण आणि नवनिर्मितीचा स्वीकार करत, भारतीय रेल्वेचा वारसा जपण्यासाठी दृढपणे वचनबद्ध आहे.

# धार्मिक सामाजिक उपक्रमाने लातूरात परशुराम जयंती साजरी

- १५३ जणांचा रेकॉर्ड ब्रेक रक्तदान शिबिरात सहभाग
- ब्राह्मण महिला उद्योगिनीचा गृह उद्योग प्रदर्शनी
- विशेष सामाजिक उपक्रमामध्ये उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल पाच ब्रम्हवृंदांचा सन्मान



**लातूर/प्रतिनिधी :** लातूर शहरांमध्ये परशुराम जयंती २०२६ समितीच्या वतीने तीन दिवसीय सामाजिक धार्मिक उपक्रम राबविण्यात आले. तर या निमित्ताने घेण्यात आलेल्या रक्तदान शिबिरामध्ये बारा वर्षातील रेकॉर्ड ब्रेक तब्बल १५३ जणांनी रक्तदान केले.

परशुराम जयंतीच्या पहिल्या उपक्रमामध्ये १७ एप्रिल रोजी येथील कल्पतरू मंगल कार्यालयाच्या सभागृहामध्ये पार पडलेल्या गृह उद्योग प्रदर्शनी मध्ये बिबियन महिला मंडळ लातूर च्या सदस्याकडून दोन दिवसीय प्रदर्शन भरविण्यात आले. या प्रदर्शनाला लातूरकराकडून मोठा प्रतिसाद मिळाला.

तर १८ एप्रिल रोजी येथील विवेकानंद संस्कार संस्था जुना औसा रोड लातूर येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते या रक्तदान शिबिरासाठी जान्हवी प्रतिष्ठान लातूर आणि परशुराम जन्मोत्सव समिती यांनी पुढाकार घेतला होता.

१८ एप्रिल रोजी सकाळी येथील परशुराम मंदिर परशुराम पार्क महिला तंत्रनिकेतन कॉलेजच्या जवळ बार्शी रोड लातूर येथे परशुराम मंदिरामध्ये जन्मोत्सवाच्या निमित्ताने अभिषेक परशुराम याग असे उपक्रम राबविण्यात आले तर येथील दयानंद सभागृहामध्ये ब्रह्मा भूषण पुरस्काराने पाच नामवंत व्यक्तींचा सन्मान करण्यात आला त्यानंतर पंडित जयतीर्थ मेवडी आणि त्यांच्या पथकाने संतवाणी सादर केला. या भगवान परशुराम जन्मोत्सव उपक्रमासाठी जयंती समितीचे अध्यक्ष: डॉ संतोष देशपांडे डॉ श्रीनिवास संदीकर, प्रा एम आर कुलकर्णी, डॉ अमित उटीकर, जितेंद्र देशमुख,धनश्री जोशी, प्रवीण देशपांडे, वल्लभ वावरे, योगेश चांदोरीकर, अनुराधा औसेकर श्रीपादचार्य जोशी, नंदकुमार कुलकर्णी, माधव कुलकर्णी, सीमा दडपे, जगदीश कुलकर्णी, वामनराव पाठक, मनोज सप्तर्षी, डॉ गिरीश कुलकर्णी, अभिजित पाटील, पुरुषोत्तम देशमुख, उदय कुलकर्णी, शैलेश कुलकर्णी, प्रवीण कस्तुरे, सुधाकर जोशी, संतोष कुलकर्णी, गोपाळ जोशी, सचिन कुलकर्णी, अभिजीत देशपांडे, किशोर कुलकर्णी, उमेश कुलकर्णी, ॲड संजय पांडे, पापाशेठ ताथोडे, अशोकराव गोविंदपूरकर, डॉ विश्वास कुलकर्णी, भूषण दाते, प्रसाद उदगीरकर,संजय प्र. अयाचित, संजय निलेगावकर,सुनील देशपांडे,. रवी देशपांडे, श्रीराम देशपांडे, बाळासाहेब देशपांडे, संजय श्री. अयाचित, डॉ.रविराज पोरे,. अमित कुलकर्णी, रंगनाथ पाटील, प्रा.संतोष कुलकर्णी, शिरीष कुलकर्णी,ॲड. उमेश देशपांडे, योगेश काळे, डॉ आनंद अंबेकर, प्रसाद पांडे, विकास कुलकर्णी, मनोज जोशी, सुयोग जोशी, योगेश उन्हाळे, राजन अयाचित, सुमुख गोविंदपूरकर, उदय देशपांडे अमित कुलकर्णी, पी एम कुलकर्णी, डॉ रविराज पोरे,मुकुंद पाठक,गोपाळ जोशी,विकास कुलकर्णी, प्रसाद पांडे यांनी पुढाकार घेतला होता.

### ब्रम्हभूषण पुरस्कार

डॉ राम पाटील(आरोग्य सेवा), कालिदास देशपांडे(सामाजिक सेवा), निलेश देशमुख (उद्योग), सौ कांचन भावठाणकर(संस्कार महिला सबलिकरण) डॉ. सौ. वृषाली देशमुख (कला शास्त्रीय गायन) यांच्या ब्रह्मभूषण पुरस्काराने सन्मान करण्यात आला. तर नगरसेवक प्रवीण कस्तुरे, आणि संजय पांडे यांचा १२ वर्षांपासून परशुराम जयंती उत्सवातून संघटन केल्यानिमित्त विशेष सन्मान करण्यात आला.

# जिद्द आणि प्रशिक्षणाची जोड: पालघरच्या वनीता उराडे यांचा नर्सरी व्यवसायातील गगनभरारी

''जिद्द, मेहनत आणि योग्य दिशा मिळाली की यशाचे शिखर सहज सर करता येते,'' हे पालघर जिल्ह्यातील रोठे (केळवा रोड) येथील सौ. वनीता विनोद उराडे यांनी आपल्या कर्तृत्वातून सिद्ध करून दाखवले आहे. केवळ १० वी पर्यत शिक्षण झालेल्या वनीता ताईंनी घरची बेताची आर्थिक परिस्थिती बदलण्यासाठी उचललेले पाऊल आज एका यशस्वी व्यवसायात रूपांतरित झाले असून, केंद्र आणि राज्य शासनाच्या महिला सक्षमीकरण मोहिमेचे त्या एक चालते-बोलते उदाहरण बनल्या आहेत.

सुरुवातीला शेती कामात गुंतलेल्या वनीताताईंना स्वत:चा काहीतरी स्वतंत्र व्यवसाय असावा, अशी तीव्र इच्छा होती. ही संधी त्यांना स्वयं सहायता गट (एकउ) आणि ईएपी कार्यक्रमाच्या माध्यमातून मिळाली. याद्वारे त्यांना ठाणे येथील 'महाबँक ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्थे'ची (िंएएऊघ) माहिती मिळाली. याच संस्थेत त्यांनी २३ जानेवारी ते १ फेब्रुवारी २०२३ या कालावधीत 'पॉली हाऊस आणि शेड नेट शेती' या विषयावर १० दिवसांचे सखोल प्रशिक्षण घेतले. या प्रशिक्षणाने त्यांच्यातील सुप्त कौशल्याला वाव दिलाच, पण त्यासोबतच आधुनिक शेती तंत्रज्ञान आणि व्यवसाय व्यवस्थापनाचा नवा दृष्टीकोनही दिला. प्रशिक्षण पूर्ण होताच त्यांनी वेळ न घालवता २७ फेब्रुवारी २०२३ रोजी आपल्या स्वप्नाला मूर्त रूप दिले. सुमारे १ लाख ५ हजार रुपयांच्या गुंतवणुकीतून त्यांनी 'वर्मी कंपोस्ट आणि नर्सरी' व्यवसायाचा श्रीगणेशा केला. बँकिंग कर्जाच्या माध्यमातून आर्थिक पाठबळ मिळाल्याने त्यांचा आत्मविश्वास अधिक दुणावला. आज त्यांच्या रोपवाटिकेमध्ये विविध प्रकारची झाडे आणि उच्च दर्जाचे गांडूळ खत उपलब्ध असून, ग्राहकांच्या पसंतीस उतरल्यामुळे त्यांचा हा व्यवसाय अल्पावधीतच स्थिरावला आहे.

एकेकाळी केवळ गृहिणी आणि शेतकरी म्हणून वावरणाऱ्या वनीता ताई आज दरमहा १७ हजार रुपयांहून अधिक उत्पन्न मिळवत आहेत. केवळ स्वत:साठी रोजगार निर्माण न करता, त्यांनी आपल्या कुटुंबाला एक भक्कम आर्थिक आधार दिला आहे. या प्रवासात त्यांच्या व्यक्तिमत्त्वात झालेला बदल लक्षणीय आहे; वाढलेला आत्मविश्वास, प्राप्त झालेले स्वावलंबन आणि समाजात निर्माण झालेली एक यशस्वी उद्योजिका ही ओळख त्यांच्या कष्टाचे फळ आहे. भविष्यात आपल्या व्यवसायाचा विस्तार करून अनेकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचे त्यांचे स्वप्न असून, त्यांचा हा यशस्वी प्रवास पालघरमधील शेकडो महिलांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

००००००००००००००००००००००००००००००

# लहान मुलांमध्ये देखील वाढतेय उच्च रक्तदाबाची (बीपी) समस्या; पालकांनो या गोष्टींकडे करू नका दुर्लक्ष

आजकाल अनेक लोक उच्च रक्तदाबाच्या समस्येनं त्रस्त आहेत. अनियंत्रित रक्तदाबामुळे हृदयरोगाचा धोका वाढतो. उच्च रक्तदाबाची समस्या कधीही हलक्यात घेऊ नये. एका अहवालानुसार, भारतातील पाचपैकी एका व्यक्तीला उच्च रक्तदाबाचा त्रास होतो. अहवालात स्पष्टपणे म्हटले आहे की, तरुण लोकही या समस्येनं ग्रस्त आहेत. शिवाय, तज्ज्ञांचे म्हणणे आहे की, अस्वस्थ जीवनशैलीमुळे मुले देखील या आजाराचे बळी ठरत आहेत. काही वर्षांपूर्वी उच्च रक्तदाबाची सम्सया ही फक्त मोठ्यांची समस्या होती. परंतु आता मुलांमध्येही ती अधिक सामान्य होत आहे.

खरे तर, मुले खूप असुरक्षित असतात. उच्च रक्तदाब त्यांचा मेंदू, हृदय, मूत्रपिंड आणि इतर अवयवांवर परिणाम करतो. म्हणून, पालकांनी या समस्येकडे दुर्लक्ष करू नये. मुलांमध्ये सामान्य रक्तदाब श्रेणी अनेक घटकांवर अवलंबून असते. तज्ज्ञांच्या मते, जर मुलांना उच्च रक्तदाब असेल तर काही लक्षणे दिसू शकतात. या लक्षणांकडे कधीही दुर्लक्षित करू नयेत. डॉक्टरांच्या मते, मुलांमध्ये उच्च रक्तदाबाची लक्षणे जाणून घेणे खूप महत्वाचे आहे. मुलांमध्ये उच्च रक्तदाबाची लक्षणे आणि ते कसे टाळता येतील याबद्दल अधिक जाणून घेऊया...

**मुलांमध्ये उच्च रक्तदाबाची कारणे**

क्लीव्हलँड क्लिनिक आणि ेकध नुसार, उच्च रक्तदाबाचे दोन प्रकार आहेत: प्राथमिक उच्च रक्तदाब आणि दुय्यम उच्च रक्तदाब.

प्राथमिक उच्च रक्तदाब: प्राथमिक उच्च रक्तदाबाला इडिओपॅथिक किंवा आवश्यक उच्च रक्तदाब असंही म्हणतात. मुलांमध्ये उच्च रक्तदाबाची सामान्य कारणे म्हणजे आनुवंशिकता, जास्त वजन किंवा लठ्ठपणा, जास्त वेळ मोबाईल टीव्ही पाहणे, अभ्यासाचा अतिरीक्त ताण, झोपेचा अभाव, भाज्या आणि फळांचा आहारात कमी समावेश, अति गोड पदार्थांचं सेवन, मैदानी खेळांचा अभाव तसेच जंक फूडचे जास्त सेवन यामुळे मुलांमध्ये प्राथिमिक उच्च रक्तदाबाची समस्या वाढत आहे.

दुय्यम उच्च रक्तदाब: म्हणजे उच्च रक्तदाब जो दुसऱ्या अंतर्निहित स्थितीमुळे होतो. मुलांमध्ये दुय्यम उच्च रक्तदाबाची काही कारणे म्हणजे मूत्रपिंडाचा आजार, हृदय समस्या, हार्मोनल असंतुलन, स्लीप एपनिया किंवा पारा, फॅथलेट्स, कॅडमियम किंवा शिसे यासारख्या पदार्थांच्या संपर्कात येणे. तज्ज्ञ असंही म्हणतात की, दीर्घकालीन मूत्रपिंडाचा आजार, रिफ्लक्स नेफ्रोपॅथी, पॉलीसिस्टिक किडनी रोग, हायपरथायरॉईडीझम, कुशिंग सिंड्रोम आणि जन्मजात ॲड्रेनल हायपरप्लासिया देखील मुलांमध्ये उच्च रक्तदाबाचा धोका वाढवतात. स्टिरॉइड्स, गर्भनिरोधक गोळ्या, औषधे, स्लीप एपनिया आणि एथेरोस्क्लेरोसिस सारख्या हृदयरोगांमुळे देखील मुलांमध्ये उच्च रक्तदाब होऊ शकतो.

**मुलांमध्ये उच्च रक्तदाबाची लक्षणे**

मुलांमध्ये उच्च रक्तदाबाची सुरुवातीची लक्षणे स्पष्ट नसतात. मात्र, डॉक्टर म्हणतात की, काही चिन्हे आहेत जी ते ओळखण्यास मदत करू शकतात. जसे की...

श्वास घेण्यात अडचण
थकवा
अस्पष्ट वजन वाढणे
जास्त घाम येणे
अंधुक दृष्टी
सतत डोकेदुखी
मळमळ आणि उलट्या
जलद हृदयाचा ठोका
श्वास घेण्यात अडचण
छातीत दुखणे

डॉक्टर या लक्षणांकडे दुर्लक्ष करू नका असा सल्ला देतात.

२००० सालापर्यंत, उच्च रक्तदाब हा वृद्धांचा आजार मानला जात होता. परंतु, गेल्या दोन दशकांत, मुले आणि किशोरवयीन मुले देखील या आजाराने ग्रस्त झाली आहेत. जर उच्च रक्तदाबाकडे दुर्लक्ष केले तर ते लहान वयातच मुलांना हृदय आणि मूत्रपिंडाचे आजार निर्माण होऊ शकतात. आजच्या परिस्थितीमध्ये पाचपैकी एका लठ्ठ मुलाला उच्च रक्तदाब असतो. यापैकी पन्नास टक्के मुलांना त्यांच्या आजाराची माहिती नसते. शहरात राहणारी वीस टक्के मुलं लठ्ठ आहेत. म्हणून, तज्ज्ञ मुलांना त्यांचा रक्तदाब आणि बीएमआय (बॉडी मास इंडेक्स) नियमितपणे तपासण्याचा सल्ला देतात.

उच्च रक्तदाबापासून मुलांना कसे वाचवायचे: उच्च रक्तदाब असलेल्या मुलांनी नियमितपणे डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. औषधांसोबतच जीवनशैलीतील बदल देखील त्यांचे आरोग्य सुधारू शकतात. आहारात निरोगी पदार्थांचा समावेश केल्याने रक्तदाब नियंत्रित होण्यास मदत होऊ शकते. तज्ज्ञ मीठ खाताना सावधगिरी बाळगण्याचा सल्ला देखील देतात. तज्ज्ञांच्या मते, ४ ते ८ वर्षे वयोगटातील मुलांनी दररोज १,२०० मिलीग्रामपेक्षा जास्त मीठ सेवन करू नये. मोठी मुले दररोज १,५०० मिलीग्रामपर्यंत मीठ सेवन करू शकतात. ही समस्या टाळण्यासाठी, मुलांना संतुलित आहार आणि नियमित शारीरिक हालचालींची आवश्यकता आहे. त्यांचा स्क्रीन टाइम कमी करा. याचा अर्थ त्यांचा फोन आणि टीव्ही पाहण्याचा वेळ कमी करा. तुमच्या मुलांना खेळणे, चालणे आणि धावणे यासारख्या क्रियाकलापांमध्ये सहभागी करा. त्यांना जंक फूड आणि गोड पदार्थांपासून दूर ठेवा. त्यांच्यावर अभ्यास करण्यासाठी जास्त दबाव आणू नका. मुलांना आठ तास झोप मिळेल याची खात्री करा.

# सत्ताधीशांना धड्या देण्याची काळाची गरज

विधेयक फेटाळले गेल्याने भाजपची राजकीय पीछेहाट नक्कीच झाली आहे. विरोधकांना एकत्र येण्याची व राहण्याची संधी मिळाली आहे. त्यांनी जनतेचे 'प्रतिनिधित्व' ही लोकशाही संकल्पना नव्याने मतदारांपर्यंत पोचवली पाहिजे.

संसद, राज्यांच्या व केंद्रशासित प्रदेशांच्या विधान सभांमध्ये महिलांना राखीव जागा ठेवण्याची तरतूद असलेले घटना दुरुस्ती विधेयक लोकसभेत नामंजूर झाले. गेली बारा वर्षे अनियंत्रित सत्ता उपभोगणार्या भारतीय जनता पक्षाचा सभागृहातील हा पहिला पराभव आहे. त्यामुळे अन्य दोन विधेयके विचारासाठी घेऊ नयेत असे सरकारला लोकसभेच्या सभापतींना सांगावे लागले. मतदार संघांची फेररचना व केंद्रशासित प्रदेशांशी संबंधित ही विधेयके महिला आरक्षण विधेयकाशी जोडलेली आहेत. 'हे विधेयक मंजूर करा अन्यथा देशातील महिला माफ करणार नाहीत' असे धमकीवजा आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले, तरीही विरोधक नमले नाहीत. या विधेयकाच्या निमित्ताने विरोधी पक्षांची एकजूट समोर आली. समाजवादी पक्षासह काही विरोधी पक्षांशी सरकारने विधेयकावरील मतदानापूर्वी संपर्क साधला होता. छोटे पक्ष विधेयकास पाठिंबा देतील असा भाजपचा होरा होता. सभागृहात ५२८ सदस्य उपस्थित होते. विधेयकाच्या बाजूने २९८ तर विरोधात २३० मते पडली. दोन तृतीयांश पाठिंब्यासाठी ५४ मते कमी पडली. भाजप व विशेषत: मोदी-शहा हा पराभव शांतपणे स्वीकारणार नाहीत हे उघड आहे. त्यामुळे जनतेस आपली भूमिका समजावून सांगण्याची जबाबदारी आता विरोधी पक्षांची आहे.



**अप प्रचार वाढणार**

महिला आरक्षण विधेयक हे 'ट्रोजन हॉर्स' सारखे आहे, त्याच्या आडून मतदार संघांची फेररचना करणे व देशाच्या सर्व भागांत भाजपच्या सत्तेची सोय करणे हे हेतु असल्याचा विरोधी पक्षांचा आरोप दुर्लक्ष करण्याजोगा नाही. २०२३ मध्ये महिला आरक्षण कायदा केल्यानंतर अचानक आता, विधानसभा निवडणुका सुरू असताना, नवे विधेयक आणण्याची घाई सरकारने का केली; या प्रश्नाला सरकारने उत्तर दिलेले नाही. नुकत्याच सुरू झालेल्या जनगणनेतून जात निहाय माहिती समोर येणे अपेक्षित आहे. संपूर्ण आकडेवारी समोर आल्या नंतर इतर मागास वर्गीय महिलांना आरक्षण मिळेल की नाही ते सरकारने सांगितले नाही. मुस्लिम महिलांसाठी वेगळे आरक्षण नसेल असे गृहमंत्री अमित शहा यांनी सभागृहात स्पष्टपणे सांगितले.

भाजपचा बहुसंख्याकवादी विचार त्यातून पुन्हा व्यक्त झाला. मतदारसंघांची फेररचना झाल्यावर त्यास आव्हान देता येणार नाही, अशी तरतूद करण्याची गरज काय होती? फेररचनेच्या घटनात्मकतेस व संघराज्य या कल्पनेस या विधेयकाने आव्हान दिल्यासारखे होते. सर्व घटनात्मक, वैधानिक संस्थांवर वर्चस्व निर्माण करण्याचा मोदी सरकारचा प्रयत्न गेल्या दशकभरात दिसला आहे. ३७०वे कलम रद्द करणे असो वा कृषी क्षेत्राशी संबंधित कायदे असोत, सभागृहात चर्चा न करता, विरोधकांना विश्वासात न घेता बहुमताच्या बळावर विधेयके संमत करून घेणे ही या सरकारची शैली आहे. याच विचाराने मांडलेल्या ताज्या विधेयकांच्या बाबतीतील शंका विरोधकांनी एका आवाजात मांडल्या आणि सरकारला निरुत्तर केले. विधेयक फेटाळले जाणार हे कळूनही सरकारने ते मागे न घेता विरोधकांवर त्याचा दोष ढकलला. विरोधकांनी चूक केली आहे, त्यांना परिणाम भोगावे लागतील अशी धमकी मोदी यांनी दिली आहेच. असे घडणार हे 'केसरी'ने या स्तंभात ('शक्ती'कोणाला? १६ एप्रिल) म्हटले होतेच. भाजप व संघ परिवार आता विरोधकांच्या बाबतीत 'अति अप प्रचार'(प्रॉपगांडा) सुरू करेल. त्यांच्या कल्पनांना विरोध करणार्यांना विकासाचे विरोधक, देशद्रोही ठरवणे हे या सरकारचे वैशिष्ट्य आहे. या सापळ्यात न अडकता या विधेयकांमागचा राजकीय हेतु जनतेपर्यंत पोचवण्याचे आव्हान विरोधी पक्षांपुढे आहे. मतदारसंघ फेररचनेचे कोणते दुष्परिणाम आहेत हे सामान्यांना सांगावे लागेल. जातीचा मुद्दा महत्त्वाचा न करता समतेला महत्त्व द्यावे लागेल. विधेयक फेटाळले जाण्याचा पश्चिम बंगाल व तामिळनाडूत काय परिणाम होतो ते ४ मे रोजी कळेल. या विधेयकाच्या निमित्ताने 'इंडिया' आघाडीतील अंतर्विरोध कमी झाले हेही महत्त्वाचे. स्वत:ला 'सत्ताधीश' समजणार्यांना त्यांच्या एकीनेच धडा दिला आहे.

# कोथिंबीरच्या रसाचे किडनीच्या पेशंटसाठी फायदे जाणून घ्या

आजकालच्या चुकीच्या जीवनशैलीमुळे आणि अस्वस्थ खाण्याच्या सवयींमुळे मूत्रपिंडाच्या समस्या सामान्य होत आहेत. जर तुम्हाला तुमचे मूत्रपिंड निरोगी राहायचे असेल तर हिरव्या धणे रस हा एक सोपा आणि प्रभावी घरगुती उपाय असू शकतो.

-ङडज ठए-ऊ मासिक पाळीच्या दरम्यान होणाऱ्या वेदनांकडे दुर्लक्ष करू नका, हे आजार असू शकते

कोथिंबीर मध्ये असलेले डिटॉक्सिफायिंग गुणधर्म शरीरातील विषारी घटक काढून टाकण्यास मदत करतात. तसेच, त्यात असलेले अँटीऑक्सिडंट्स, व्हिटॅमिन सी, पोटॅशियम आणि फायबर मूत्रपिंड आणि मूत्रमार्ग मजबूत करतात. चला त्याचे फायदे आणि त्याचे सेवन करण्याची योग्य पद्धत जाणून घेऊया.

-ङडज ठए-ऊ मनुका महिलांसाठी खूप फायदेशीर आहे, फायदे जाणून घ्या

कोथिंबीरचा रस मूत्रपिंडाच्या आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहे कारण त्यात अँटीऑक्सिडंट आणि दाहक-विरोधी गुणधर्म असतात, जे मूत्रपिंडातील दगड आणि इतर समस्या टाळतात. तसेच, हा रस शरीरातील हानिकारक विषारी पदार्थ बाहेर काढण्यास मदत करतो, ज्यामुळे मूत्रपिंडांवरील दबाव कमी होतो आणि त्यांना चांगले कार्य करण्यास मदत होते.

कोथिंबीरचा रस पिण्याचे इतर फायदे



पचनसंस्था: कोथिंबीरचा रस पचनसंस्था सुधारण्यास मदत करतो, ज्यामुळे शरीराला पोषक तत्वे शोषण्यास मदत होते.

रोगप्रतिकारक शक्ती वाढवते: हिरव्या धण्यांचा रस केवळ मूत्रपिंडाचे आरोग्य सुधारत नाही तर रोगप्रतिकारक शक्ती देखील मजबूत करतो. त्यात असलेले अँटीऑक्सिडंट्स आणि जीवनसत्त्वे रोगप्रतिकारक शक्ती वाढवतात आणि मूत्रपिंडाच्या संसर्गाचा धोका कमी करतात.



यूटीआयमध्ये आराम मिळतो: कोथिंबीरच्या रसामध्ये आढळणारे अँटीबॅक्टेरियल गुणधर्म यूटीआय (मूत्रमार्गाचा संसर्ग) रोखतात आणि मूत्रपिंड निरोगी ठेवण्यास मदत करतात. नियमित सेवनाने यूटीआय आणि मूत्रपिंडाच्या संसर्गाची शक्यता कमी होते.

-ङडज ठए-ऊ जांभूळ खाताना या चुका करू नका

कोथिंबीरचा रस कसा प्यावा

कोथिंबीरचा रस तयार करण्यासाठी, प्रथम ताजी कोथिंबीरची पाने पूर्णपणे धुवा जेणेकरून त्यावरील घाण किंवा कीटकनाशके निघून जातील. त्यानंतर, ही पाने मिक्सरमध्ये थोडे पाणी घालून बारीक करा. पाने चांगली बारीक झाल्यावर, मिश्रण गाळून त्याचा रस काढा. तुम्ही सकाळी हा रस पिऊ शकता. कोथिंबीरचा रस नियमितपणे पिल्याने किडनीचे आरोग्य सुधारते आणि शरीरातील विषारी पदार्थ देखील बाहेर पडतात.

अस्वीकरण: आरोग्य, सौंदर्य काळजी, आयुर्वेद, योग, धर्म, ज्योतिष, वास्तु, इतिहास, पौराणिक कथा इत्यादी विषयांवर वेबदुनियामध्ये प्रकाशित/प्रसारित होणारे व्हिडिओ, लेख आणि बातम्या केवळ जनहित लक्षात घेऊन तुमच्या माहितीसाठी आहेत. वेबदुनिया याची सत्यता पुष्टी करत नाही. कोणताही प्रयोग करण्यापूर्वी, तज्ञांचा सल्ला नक्कीच घ्या.


# फुफ्फुसाच्या कर्करोगाची मुरव्य लक्षणे

म्हणजे बरा न होणारा खोकला, छातीत दुखणे, श्वास घेण्यास त्रास होणे, खोकल्यातून रक्त पडणे, आणि वजनात अचानक घट होणे ४, ६, १२. ही लक्षणे सुरुवातीला सौम्य असू शकतात, परंतु आजार वाढल्यास ती गंभीर रूप घेतात. धूम्रपान करणाऱ्यांमध्ये हा धोका अधिक असतो १, ६.

फुफ्फुसाच्या कर्करोगाची प्रमुख लक्षणे:

सतत खोकला: अनेक आठवड्यांपर्यंत राहणारा आणि दिवसेंदिवस खराब होणारा खोकला

खोकल्यातून रक्त: खोकल्यासोबत कफ किंवा रक्ताचे डाग पडणे ६. श्वास घेण्यास त्रास (ड्ढेींपर्शीी ेष लीशरींह): थोडं चालल्यावर किंवा विश्रांती घेतानाही श्वास कोंडल्यासारखे वाटणे ४.




छातीत दुखणे: खोल श्वास घेताना, खोकताना किंवा हसताना छातीत वेदना होणे आवाजात बदल: आवाज घोगरा (हेरीशपर्शीी) होणे किंवा आवाजात बदल होणे ४. अचानक वजन कमी होणे: कोणतीही कसरत किंवा डाएट न करता भूक न लागणे आणि वजन कमी होणेशरीरातील इतर वेदना: हाडे, पाठ किंवा खांद्यामध्ये सतत वेदना होणे वारंवार होणारे आजार: वारंवार न्यूमोनिया किंवा ब्रॉन्कायटिस सारखे श्वसनाचे विकार होणे. **कधी सावध व्हावे?**

जर तुम्हाला किंवा तुमच्या ओळखीच्या कोणालाही वरील लक्षणे दीर्घकाळ जाणवत असतील, तर विलंब न करता डॉक्टरांचा सल्ला घ्या.. धूम्रपान, हवेतील प्रदूषण, आणि फुफ्फुसाचे जुने आजार हे धोक्याचे घटक आहेत

## १ Doctor Tips — सल्ला डॉक्टरचा



नियमित सहवास केल्याने केवळ शारीरिक नव्हे, तर मानसिक रूपानेही व्यक्ती फिट राहते.

३) रोगप्रतिकारक शक्ती वाढवतो सहवास एका शोधानुसार सहवास करण्याआधी काही वेळ आधी व्यायाम केल्याने आरोग्यावर सकारात्मक प्रभाव पडतो. यासोबत तुम्हाला आल्हाददायक आणि उर्जा आल्यासारखं वाटेल. चांगलं आरोग्य राखण्यासाठी सेक्स महत्वाचा ठरतो. **(क्रमश. )**

## २ Joke — विनोद




गोरा रंग :

ऐश्वर्या : तुझ्या पतीचा हळूहळू गोरा रंग होत चाललाय याचे कारण काय?

काजोल : अगं, पूर्वी ते कोळशाच्या वखारीत कामाला होते. आता ते पिठाची चक्की चालवतात.

## ३ Message — संदेश



Me aapko ENGLISH ka 1 word bhejta hu,
Jise aap aage se padho ya pichhe se,
aapko aapka hi naam dikhai dega,.
- U L L U

## ४ Thought — सुविचार




ग्रंथापेक्षा अनुभव बरेच काही सांगून जातात. - जो हर्बर्ट

**संस्कृत सुभाषित**

**वीणा वंशश्चन्दनं चन्द्रभास - श्चन्द्राभासा**
**यौवनस्थास्तरुण्य:। नैतद्रम्यं क्षुत्पिपासातुराणां**
**सर्वारम्भास्तण्डुला प्रस्थमूला:।।**

अर्थ -भूक आणि तहानेने व्याकूळ झालेल्या माणसाला वीणावादन,चंद्राचे शीतल चांदणे,चंदनाचा सुगंध, चंद्रासारखा चेहरा असणाऱ्या तरुणी यांचे आकर्षण वाटत नाही. मापटेभर तांदळाच्या भाताने क्षुधा शमल्यानंतरच त्याला इतर गोष्टींमध्ये स्वारस्य वाटते.

# मनोरंजक महाशब्दकोड्यांचा समाचार



### आडवे शब्द

१. रमेश देवबरोबरच्या या सिनेमात सीमा खलनायिका होती
६. ऐनवेळी कच खाणारा
११. न्याय
१२. सोशिकपणा
१४. नवरा
१५. अरण्य
१६. लोटी
१८. उगवत्या सूर्याचा देश
२१. च्या पुढे, समक्ष
२३. वेळेचा कमीत कमी भाग
२४. विरोध, प्रतिबंध
२७. पत, प्रतिष्ठा
२८. शंकराजवळचे चर्मवाद्य
२९. टप्प्याने टप्प्याने केलेला प्रवास
३२. अवधान, लक्ष
३३. भडक
३६. पळून जाणे
३९. कलावंत
४१. मत नोंदवण्याचा कालबाह्य कागद
४४. सोसाट्याचा वारा
४५. पवित्र
४६. संत ज्ञानेश्वरांनी लिहिलेली प्रार्थना
४९. परिस्थिती, कालाचे परिमाण
५२. सामान
५३. बस्तान
५४. मज्जाव
५६. आश्रय, थारा
५८. प्रकाश निर्माण करणारा सूर्य
६०. वाहणारी हवा
६१. जन्मदाते
६३. पाणी
६५. दक्ष
६६. यजमान
६७. आरोप, बालंट
६८. प्रयाण
६९. लोकमानस
७१. इच्छा, आकांक्षा (हिंदी)
७३. आपल्या उत्तर सीमेवरील एक राष्ट्र
७५. किंचित ओलावलेले (डोळे) (हिंदी)
७६. कामाचा उरका
७८. शिव
८०. अवाजवी
८२. भाजपा नेते 'नितीन ----'
८४. संथ
८५. स्तुतीची गाणी
८६. दु:खी होणे, वेदनेने ओरडणे

### उभे शब्द

१. लकब
२. खिशाला चाट
३. धास्ती, भीती
४. आपले राष्ट्रगीत
५. आलटापालट
७. खून
८. शिकारीसाठी हेरलेला प्राणी
९. डोसा
१०. शरीर, काया
१३. गलबताचे कापड
१७. भाकरी व इतर पदार्थांचा कुस्करा, दूधभाकरी
१९. वैमानिक (इंग्रजी)
२०. अंकुर
२२. रम्य, मनोहर
२५. दात
२६. अंधार
२७. फोडणीचे वरण
३०. प्रचंड
३१. जपजाप्य
३४. बगळा
३५. थेळ, सरळ
३७. लोकरीचा एक प्रकार
३८. लग्नकार्याचे लेखी आमंत्रण
४०. लबाडीचा हेतू
४२. सर्वस्वाने
४३. यापेक्षा 'आज' महत्त्वाचा
४५. पालनपोषण करणारा
४७. शोभणारा
४८. मृत्यूदेवता
५०. जयश्री गडकरचा चंद्रकांत गोखले यांच्या बरोबरचा गाजलेला चित्रपट
५१. नूतन
५२. तंबाखूचा असल्यास घातक
५५. मानबिंदू (ला.)
५७. कमळ
५८. दिवस
५९. कणीदार
६०. संसारातून अंग काढून घेणे
६१. सुखाच्या मोजमापाचे धान्य
६२. दाह, मत्सर
६४. मिरवणूक
६५. पत्राचा कालबाह्य झालेला मायना
६६. नम्रतेने मान खाली घालणे
६७अ. आल्या पावली, लगेच
७०. 'राही --- दुख की चिंता क्यों सताती है' (दोस्ती)
७२. थकवा
७४. सांभाळ
७७. खाली खेचणे, पराभूत करणे
७८. अधिकाराचे स्थान
७९. त्रासलेला
८०. शर्त
८२. माराची उठलेली खूण
८३. अस्वल

### आडवे उत्तरे

१.अपराध ६.अवसानघातकी ११.दाद १२.सहनशीलता १४.धव १५.वन १६.गडवा १८.जपान २१.समोर २३.क्षण २४.हरकत २७.आब २८.डमरू २९.मजलदरमजल ३२.भान ३३.बटबटीत ३६.पलायन ३९.कलाकार ४१.मतपत्रिका ४४.वादळ ४५.पाक ४६.पसायदान ४९.कालमान ५२.माल ५३.जम ५४.मना ५६.निवारा ५८.दिवाकर ६०.वारा ६१.जनकजननी ६३.जीवन ६५.सावध ६६.नवरा ६७.किटाळ ६८.प्रस्थान ६९.जनमत ७१.तमन्ना ७३.नेपाळ ७५.नम ७६.रपाटा ७८.पवित्र ८०.अवास्तव ८२.गडकरी ८४.मंद ८५.स्तवन ८६.कळवळणे

### उभे उत्तरे

१.अदा २.पदरमोड ३.धसका ४.जन गण मन ५.हलवाहलवी ७.वध ८.सावज ९.घावन १०.तन १३.शीड १७.भाकरकाला १९.पायलट २०.कोंब २२.रमणीय २५.रद २६.तम २७.आमटी ३०.जबरदस्त ३१.जपतप ३४.बक ३५.तडक ३७.नमदा ३८.पत्रिका ४०.कावा ४२.तनमनधनाने ४३.काल ४५.पालक ४७.साजरा ४८.यम ५०.मानिनी ५१.नवा ५२.मावा ५५.नाक ५७.राजीव ५८.दिन ५९.रवाळ ६०.वानप्रस्थ ६१.जव ६२.जळजळ ६४.वरात ६५.सा न वि वि ६६.नतमस्तक ६७अ.टाकोटाक ७०.मनवा ७२.मरगळ ७४.पालन ७७.पाडणे ७८.पद ७९.त्रस्त ८०.अट ८२.वळ ८३.रीस



# क्रीडा विश्व



## थोडक्यात/ संक्षिप्त

### बीसीसीआयचा ब्रह्मास्त्र सज्ज, एकाच वेळी दोन संघ मैदानात उतरणार

मुंबई–भारतीय क्रिकेटमधील आगामी व्यस्त वेळापत्रक लक्षात घेऊन भारतीय क्रिकेट नियामक मंडळ टी–२० फॉरमॅटसाठी ३०–३५ खेळाडूंचा मोठा पूल तयार करत आहे. यामागचं प्रमुख कारण म्हणजे यंदा वर्षाअखेर होणारा वेळापत्रक ओव्हरलॅप आहे. या काळात आशियाई क्रीडा स्पर्धा आणि भारत विरुद्ध वेस्ट इंडिज टी–२० मालिका एकाच वेळी खेळवली जाणार आहे. त्यामुळे निवड समिती दोन वेगवेगळ्या, पण तितक्याच सक्षम संघांची उभारणी करत आहे, जेणेकरून भारत एकाच वेळी दोन आंतरराष्ट्रीय स्पर्धामध्ये सहभागी होऊ शकेल. बीसीसीआयच्या मते, २०२८ ऑलिम्पिकचा विचार करता संघाची खोली आणि लवचिकता वाढवणं आता अत्यावश्यक बनलं आहे.

या मोठ्या योजनेची सुरुवात जून २०२६ मध्ये होणाऱ्या आयर्लंड दौऱ्यापासून होणार आहे. आयर्लंडविरुद्धच्या टी–२० मालिकेसाठी बीसी–सीआय मोठा संघ पाठवणार असून, यात अनुभवी खेळाडूंसोबत अनेक नवोदितांना संधी दिली जाईल. या दौऱ्याचा मुख्य उद्देश म्हणजे संभाव्य खेळाडूंना आंतरराष्ट्रीय स्तरावर तपासून पाहणं, जे पुढे आशियाई क्रीडा स्पर्धामध्ये भारताचं प्रतिनिधित्व करू शकतील. हा प्रयोग आगामी अफगाणिस्तान मालिका आणि इतर महत्त्वाच्या स्पर्धासाठी मजबूत बॅकअप तयार करण्यास उपयुक्त ठरेल.

सध्या आयपीएल २०२६ मध्ये दमदार कामगिरी करणाऱ्या खेळाडूंवर निवडकर्त्यांची बारकाईने नजर आहे. फलंदाजीत वैभव सूर्यवंशी, यशस्वी जैस्वाल, प्रियांश आर्य आणि अंगकृष रघुवंशी यांनी प्रभाव टाकला आहे. त्याचबरोबर रजत पाटीदार आणि आयुष बदोनी देखील आपली दावेदारी मजबूत करत आहेत.

### २९ व्या राज्यस्तरीय कामगार कबड्डी स्पर्धेचे उद्या उद्घाटन

मुंबई–औद्योगिक व व्यावसायिक कामगारांच्या २९ व्या आणि महिलांच्या २४ व्या खुल्या राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा मुंबईत उद्या मंगळवार २१ एप्रिल पासून आयोजित करण्यात आल्या आहेत.

उपमुख्यमंत्री तथा मुंबईचे पालकमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते सायंकाळी ५ वाजता प्रभादेवी रेल्वे स्थानकाजवळील हुतात्मा बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन येथे या स्पर्धेचे उद्घाटन होणार आहे.यावेळी कामगार मंत्री आकाश फुंडकर, कामगार राज्यमंत्री आशिष जयस्वाल, विधानपरिषद सदस्य तथा मुख्य प्रतोद (राज्यमंत्री दर्जा) मनिषा कायंदे, महापौर रितू तावडे, लोकसभा सदस्य अनिल देसाई, विधान परिषद सदस्य सुनील शिंदे, आमदार कालिदास कोळंबकर, आमदार महेश सावंत, नगरसेवक यशवंत किल्लेदार आदी लोकप्रतिनिधींसह कामगार विभागाच्या प्रधान सचिव आय.ए.कुंदन, कामगार आयुक्त डॉ.एच.पी.तुम्मोड, असंघटीत कामगार विभागाचे विकास आयुक्त सुशील खोडवेकर, मुंबई शहर जिल्हाधिकारी आंचल गोयल, कामगार विभागाच्या उपसचिव रोशनी कदम – पाटील, कामगार कल्याण आयुक्त भास्कर मोरडे यांची उपस्थिती असेल.पुरुष शहरी, पुरुष ग्रामीण आणि महिला (खुला) अशा तीन गटात स्पर्धेचे सामने होतील. तिन्ही गटातील अंतिम विजेत्या संघाना प्रत्येकी ५० हजार, अंतिम उपविजेत्या संघांना प्रत्येकी ३५ हजार आणि अंतिम उपांत्य उपविजेता संघाना प्रत्येकी २० हजार रुपये बक्षिस दिले जाईल. तसेच विजेत्या संघांना सांघिक चषक, खेळाडूंना पदके आणि प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात येईल.

राज्यभरातून सुमारे ११० हून अधिक संघ स्पर्धेत सहभागी झाले असून २१ ते २५ एप्रिल या कालावधीत दररोज सायंकाळी ४ ते रात्री ९.३० वाजेपर्यंत स्पर्धेचे सामने होतील.

### जोफ्रा आर्चरची अनोखी हॅटट्रिक!

**कोलकाता :** कोलकाताच्या ईडन गार्डन्सच्या मैदानात रंगलेल्या कोलकाता नाईट रायडर्स विरुद्धच्या सामन्यात १५५ धावांचा बचाव करताना जोफ्रा आर्चरने राजस्थान रॉयल्सच्या संघाला दमदार सुरुवात करून दिली. पहिल्याच षटकातील पहिल्या चेंडूवर त्याने टिम सिफर्टला शून्यावर माघारी धाडले. आयपीएलच्या हंगामात सलग तिसऱ्या सामन्यात जोफ्रा आर्चरने पहिल्या चेंडूवर विकेट घेण्याचा पराक्रम केला आहे. या कामगिरीसह त्याने आयपीएल स्पर्धेत सर्वाधिक वेळा पहिल्या चेंडूवर विकेट घेणाऱ्या गोलंदाजांच्या यादीत मोहम्मद शमीच्या विक्रमाशी बरोबरी साधली आहे. कोलकाता नाईट रायडर्सचा सलामीवीर टिम सिफर्टला पहिल्याच चेंडूवर त्रिफळाचित करण्याआधी जोफ्रा आर्चरनं सनरायझर्स हैदराबाद विरुद्धच्या सामन्यात स्फोटक बॅटर अभिषेक शर्माला मगोल्डन डकफसह तंबूचा रस्ता दाखवला होता. आरसीबीच्या सामन्यात त्याने फिल सॉल्टवर हीच वेळ आणली होती. जोफ्रा आर्चरने आयपीएलमध्ये पहिल्या चेंडूवर सर्वाधिक विकेट्स घेणाऱ्या मोहम्मद शमीच्या विक्रमाशी बरोबरी केली आहे. मोहम्मद शमीने १२४ सामन्यात पाच वेळा पहिल्या चेंडूवर विकेट घेतल्याचा रेकॉर्ड आहे. यंदाच्या हंगामात सलग तीन सामन्यात पहिल्या चेंडूवर विकेट घेत जोफ्रा आर्चरने ५८ व्या



# मुंबई लोकल सुसाट! गुजरातवर ऐतिहासिक विजय



नवी मुंबईः आयपीएल २०२६ मधील ३० व्या सामन्यात मुंबई इंडियन्सने गुजरात टायटन्सवर ९९ धावांनी दणदणीत विजय मिळवला. तिलक वर्माने ४५ चेंडूत झळकावलेल्या नाबाद १०१ धावांच्या जोरावर मुंबईने १९९ धावांचा डोंगर उभारला होता. प्रत्युत्तरात मुंबईच्या भेदक गोलंदाजीसमोर गुजरातचा डाव अवघ्या १०० धावांत आटोपला. या विजयासह मुंबईने हंगामातील दुसऱ्या विजयाची नोंद केली आहे. आयपीएल २०२६ स्पर्धेतील ३० वा सामना मुंबई इंडियन्स विरूद्ध गुजरात टायटन्स या दोन्ही संघांमध्ये पार पडला. या स्पर्धेतील पहिल्याच सामन्यात कोलकाता नाईट रायडर्स संघाला पराभूत केल्यानंतर पुढील सर्व सामन्यांमध्ये मुंबईला पराभवाचा सामना करावा लागला आहे. पण

## विजय मिळवून गुणतालिकेत घेतली मोठी झेप

गुजरात टायटन्स संघाविरूद्धच्या सामन्यात मुंबई इंडियन्सच्या गोलंदाजांनी आणि फलंदाजांनी दमदार कामगिरी केली.पहिल्या डावात तिलक वर्माने शतक झळकावून संघाची धावसंख्या १९९ धावांवर पोहोचवली. त्यानंतर धावांचा बचाव करताना युवा गोलंदाज अश्वनी कुमारने दमदार गोलंदाजी करुन मुंबईला या हंगामातील दुसरा विजय मिळवून दिला. मुंबई इंडियन्सला हा सामना जिंकण्यासाठी २०० धावांचा डोंगर सर करायचा होता. या धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या गुजरातला पहिल्याच चेंडूवर मोठा धक्का बसला. मुंबईकडून जसप्रीत बुमराह पहिलं षटक टाकण्यासाठी गोलंदाजीला आला. त्याने पहिल्याच चेंडूवर साई सुदर्शनला गोल्डन डकवर माघारी धाडलं. त्यानंतर हार्दिक पंड्याने जोस बटलरला बाद केलं. त्यानंतर कर्णधार शुबमन गिल अवघ्या १४ धावा करून माघारी परतला. वॉशिंग्टन सुंदरने २६ धावांची खेळी केली. तर शाहरुख खानने १७ आणि कगिसो रबाडाने १२ धावांचे योगदान दिले. पण गुजरातचा डाव अवघ्या १०० धावांवर आटोपला. मुंबईने हा सामना ९९ धावांनी आपल्या नावावर केला.

मुंबई इंडियन्सचा संघ नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजी करण्यासाठी मैदानात आला होता.मुंबईला पावरप्लेमध्ये हवी तशी सुरुवात करता आली नव्हती. सूर्यकुमार यादव, क्विंटन डीकॉक आणि दानिश मालेवार स्वस्तात माघारी परतले. त्यानंतर नमन धीर आणि तिलक वर्माने मिळून संघाचा डाव सावरला. दोघांनी मिळून महत्वपूर्ण भागीदारी केली. हार्दिक १५ धावा करून माघारी परतला. तर तिलक वर्मा शेवटपर्यंत उभा राहिला. त्याने ४५ चेंडूंमध्ये नाबाद १०१ धावांची खेळी केली. या खेळीच्या बळावर मुंबई इंडियन्सने ५ गडी बाद १९९ धावा केल्या.

या सामन्याआधी मुंबई इंडियन्सचा संघ गुणतालिकेत सर्वात शेवटी होता. पण हा सामना जिंकून मंबई इंडियन्सने गुणतालिकेत ४ गुणांसह सातव्या स्थानी झेप घेतली आहे. हा विजय मुंबई इंडियन्ससाठी खास आहे. कारण मुंबईचा संघ गुजरातला त्यांच्या होम ग्राऊंडवर पराभूत करू शकला नव्हता. आता पहिल्यांदाच मोठ्या विजयाची नोंद केली आहे.

## भारतीय महिला संघाचा सलग दुसरा पराभव

डर्बन : भारतीय महिला क्रिकेट संघ सध्या दक्षिण आफ्रिकेच्या दौऱ्यावर आहे. पाच सामन्यांच्या टी–२० मालिकेतील दुसऱ्या सामन्यात भारतीय संघाला सलग दुसऱ्यांदा पराभवाला सामोरे जावे लागले. क्लोई ट्रायॉन आणि तुमी सेखुखुने यांनी दक्षिण आफ्रिकेसाठी उत्कृष्ट गोलंदाजी केली. पण भारतीय संघ सावरू शकला नाही. भारताने १४७ धावा केल्या, ज्याचा पाठलाग दक्षिण आफ्रिकेने १७.१ षटकांत २ विकेट्स गमावून केला आणि ८ विकेट्स राखून विजय मिळवला.

डर्बनमध्ये भारतीय महिला संघ प्रथम फलंदाजीसाठी मैदानात उतरला. शेफाली वर्माने ३८ चेंडूंमध्ये ७ चौकार आणि २ षटकारांच्या मदतीने ५७ धावा केल्या. मात्र, इतर कोणताही फलंदाज मोठी खेळी करू शकला नाही. अनुष्का शर्माने शेफालीसोबत ३१ चेंडूंमध्ये २८ धावा करून भारताला २० षटकांत १४७ धावांपर्यंत पोहोचवले. दक्षिण आफ्रिकेकडून क्लोई ट्रायॉन आणि तुमी सेखुखुने यांनी प्रत्येकी तीन विकेट्स घेतल्या.

कोलकाता : कोलकाता नाईट रायडर्सने राजस्थान रॉयल्सला चार गडी राखून पराभूत करून आयपीएल २०२६ मध्ये आपला पहिला विजय नोंदवला. केकेआरसाठी हा हंगाम चांगला १४८ धावांचे लक्ष्य गाठताना, दक्षिण आफ्रिकेची कर्णधार लॉरा वॉल्व्हार्डने सात चौकार आणि एका षटकारासह ३४ चेंडूंमध्ये ५४ धावा केल्या. सुने लुसनेही ४६ चेंडूंमध्ये ५७ धावांची शानदार खेळी केली. या दोघींनी पहिल्या विकेटसाठी १०६ धावांची भागीदारी करून सामना जवळपास संपवला होता. त्यानंतर टॅझमिन ब्रिट्सने २० धावा केल्या आणि संघाने १७.१ षटकांत दोन गडी गमावून १४८ धावा करत सहज विजय मिळवला. या विजयासह, दक्षिण आफ्रिकेने पाच सामन्यांच्या टी–२० मालिकेत २–० अशी आघाडी घेतली आहे.

## पंजाबचा सलग पाचवा विजय

चंदीगड : पंजाब किंग्स यांनी आपला विजयाचा झेंडा फडकावत ठेवत, पुन्हा एकदा पाचव्यांदा लखनऊ सुपर जायंट्स विरुद्ध बाजी मारली आहे. प्रियांश आर्य (९३) आणि कूपर कॉनोली (८७) यांच्यातील विक्रमी १८२ धावांच्या भागीदारीच्या आणि मार्को जॅनसेनच्या भेदक गोलंदाजीच्या जोरावर पंजाब किंग्सने लखनऊ सुपर जायंट्सचा ५४ धावांनी पराभव केला. प्रथम फलंदाजी करताना पंजाबने २० षटकांत सात विकेट्स गमावून २५४ धावा केल्या. लखनऊला निर्धारित षटकांत पाच विकेट्स गमावून केवळ २०० धावाच करता आल्या. या विजयासह, पंजाबने सहा सामन्यांतील पाचवा विजय मिळवून गुणतालिकेत आपले अव्वल स्थान कायम राखले, तर लखनऊला या हंगामातील चौथ्या पराभवाला सामोरे जावे लागले.

## अभिषेक बच्चन यांच्या नेतृत्वाखालील इटीपीएलची ग्लासगो फ्रँचायझीची घोषणा

युरोपमधील पहिली आयसीसी–मान्यताप्राप्त ढ२० स्पर्धा ‘युरोपियन ढ२० प्रीमियर लीग’ (एढझङ)ने आपल्या ग्लासगो–स्थित फ्रँचायझी ‘ग्लासगो मुगाफियन्स’ची अधिकृत घोषणा केली आहे. या संघाला मुगाफी ग्रुपचे संस्थापक भागीदार म्हणून पाठबळ असून, संघाची मालकी तन्शा बत्रा यांच्याकडे आहे. वेस्ट इंडिजचा दिग्गज खेळाडू ख्रिस गेल हा सह–मालक आणि जागतिक ब्रँड म्बेसेडर म्हणून संघाशी जोडला गेला आहे.

ईटीपीएलचे सह–मालक अभिषेक बच्चन यांनी या नव्या फ्रँचायझीचे स्वागत करताना सांगितले की, युरोपमध्ये क्रिकेटसाठी मोठी क्षमता असून, ही लीग नव्या प्रतिभेला व्यासपीठ देण्यासोबतच विविध बाजारपेठांना जोडण्याचे काम करेल.



ईटीपीएलचा पहिला हंगाम २६ ऑगस्ट ते २० सप्टेंबर २०२६ दरम्यान खेळवला जाणार आहे. या स्पर्धेत ग्लासगो, मस्टरडॅम, एडिनबर्ग, डब्लिन, बेलफास्ट आणि रॉटरडॅम या सहा शहरांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या संघांमध्ये एकूण ३३ सामने रंगतील. मुगाफी ग्रुपचे सीईओ विपुल अग्रवाल यांनी सांगितले की, क्रिकेटची प्रेक्षकसंख्या झपाट्याने वाढत असून, युरोपमध्ये अशा प्रकारची लीग सुरू होणे ही मोठी संधी आहे.

संघाच्या मालक तन्शा बत्रा यांनीही ग्लासगोमधील स्थानिक क्रिकेटला व्यावसायिक व्यासपीठ मिळणार असल्याचे सांगितले. तर ख्रिस गेलने या नव्या प्रवासाबद्दल उत्साह व्यक्त करत, युरोपमध्ये क्रिकेटच्या विस्तारासाठी ही लीग महत्त्वाची ठरेल, असे म्हटले.दरम्यान, ईटीपीएलमध्ये इतरही अनेक दिग्गजांचा सहभाग आहे. मस्टरडॅम संघाला स्टीव्ह वॉ आणि जेमी ड्वायर यांचा पाठिंबा असून, बेलफास्ट संघात ग्लेन मॅक्सवेल, तर एडिनबर्ग संघात काईल मिल्स, नॅथन मॅककुलम आणि मिचेल सँटनर यांसारखे आंतरराष्ट्रीय खेळाडू सहभागी आहेत.ही लीग ङ्क्रिकेट आयर्लंडफ आणि ङ्ग्रूल्स ग्लोबलफ्चा संयुक्त उपक्रम आहे.

## सगळे बाद झाले, पण तिलक एकटाच भिडला, गुजरातला अक्षरशः चोपून काढले, किती धावा केल्या?

**अहमदाबाद**–अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडिअमवर मुंबई इंडियन्स आणि गुजरात टायटन्स यांच्यात रोमांचक सामना सूरू आहे.या सामन्यात गुजरात टायटन्सच्या कगिसो रबाडाने मुंबई इंडियन्सच्या आघाडीच्या तीन फलंदाजांना बाद करून मुंबईला संकटात टाकलं होतं पण या संकटात तिलव वर्मा संकटमोचक बनून आला आणि त्याने मुंबईला सन्मानजनक धावांपर्यंत पोहोचवलं आहे. तिलक वर्माने यावेळी नाबाद शतकीय खेळी केली होती. या खेळीच्या बळावर त्याने मुंबईचा डाव सावरला होता. या सामन्यात मुंबई इंडियन्सचा अनुभवी खेळाडू सूर्याकुमार यादवने पुन्हा एकदा टीमला धोका दिला आहे. सुर्याकुमार पुन्हा एकदा स्वस्तात बाद झाला आहे. विशेष म्हणजे गुजरात टायटन्सच्या कगिसो रबाडाने त्याला ९ बॉलमध्ये पव्हेलियनचा रस्ता दाखवला आहे.

मुंबई इंडियन्सकडून सलामीला रोहित शर्माच्या अनुपस्थित डेब्यू केलेल्या दानिश मालेवारला संधी देण्यात आली होती. आणि त्याच्या सोबत मागच्या सामन्यात शतक



ठोकणारा क्विंटन डिकॉक मैदानात आला होता. यावेळी डेब्यूटंट दानिश मालेवारला अवघ्या दोन धावावर कगिसो रबाडाने बाद केले. त्याच्यानंतर नमन धीर मैदानात आला. त्यावेळी क्विंटन डिकॉक चागंला लयीत दिसत होता पण त्याला देखील रबाडाने १३ धावांवर बाद केले.क्विंटन डिकॉक बाद झाल्यानंतर सूर्यकुमार यादव मैदानात आला होता.यावेळी त्याच्यासोबत नमन धीर मैदानात होता. दोघांना मुंबई इंडियन्सचा डाव सावरणे आवश्यक होते.पण कगिसो रबाडाने सूर्यालाही माफ केले नाही. रबाडाने त्याच्या नऊ बॉलमध्ये सूर्याला क्लिन बोल्ड केले आहे. विशेष म्हणजे रबाडाने ज्या प्रकारे बॉल टाकला होता, तो खेळता सूर्या पूर्णपणे चूकला आणि क्लिन बोल्ड झाला.

सूर्या बाद झाल्यानंतर चांगला लयीत खेळत असलेला नमन धीर ४५ वर बाद झाला. त्याच्यानंतर तिलक वर्मा आणि हार्दिक पांड्या मैदानात होता. या दोघांनी मिळून मुंबईचा डाव सावरला होता. मुंबई इंडियन्सने ९६ वर ४ विकेट गमावले होते, तिथून या दोघांनी मुंबईला १७७ पर्यंत नेले होते. यावेळी हार्दिक पांड्या १५ धावावर बाद झाला.हार्दिक पांड्या बाद झाल्यानंतर तिलक वर्माने एकट्याने एका बाजूने डाव सारवत शेवटी ४५ बॉलमध्ये १०१ धावांची नाबाद खेळी केली होती. या खेळी दरम्यान त्याने ७ षटकार आणि ८ चौकार मारले होते.तिलक वर्माच्या या मोक्याच्या क्षणी आलेल्या या खेळीमुळे मुंबईचा डाव सावरला होता. दरम्यान तिलक वर्माच्या या १०१ धावांच्या नाबाद शतकीय आणि नमन धीरच्या ४५ धावांच्या बळावर मुंबई इंडियन्सने ५ विकेट गमावून १९९ धावा केल्या होत्या. त्यामुळे आता गुजरात टायटन्ससमोर २०० धावांचे लक्ष्य होते.

# खाशाबा जाधव यांना तब्बल ७४ वर्षांनी मरणोत्तर पद्मविभूषण मिळणार

मुंबई –’पॉकेट डायनॅमो’ या नावाने जगभरात प्रसिद्ध असलेल्या कुस्तीगीर खाशाबा दादासाहेब जाधव यांचा प्रवास कोणत्याही कुस्तीपट्टूसाठी प्रेरणादायी आहे. स्वातंर्त्यप्राप्तीनंतर देशाला पहिले वैयक्तिक ऑलिम्पिक पदक मिळवून देणारे थोर कुस्तीगीर खाशाबा जाधव यांना मरणोत्तर पद्मविभूषण पुरस्कार मिळाला, अशी मागणी गेल्या अनेक दिवसांपासून केली जात आहे. अशातच खाशाबा जाधवांच्या मुलाच्या लढल्याला यश मिळताना दिसत आहे. १९५२ साली हेलसिंकी ऑलिंपिकमध्ये त्यांनी फ्रीस्टाइल कुस्तीत जिंकलेलं कांस्यपदक हे भारताला स्वातंर्त्योत्तर काळात मिळालेलं पहिलं वैयक्तिक पदक होतं.

भारताचे पहिले ऑलम्पिकवीर खाशाबा जाधव यांना पद्मविभूषण पुरस्कार मिळण्याची प्रतिक्षा अखेर संपली म्हणावी लागेल. पैलवान खाशाबा जाधव यांनी १९५२ मध्ये हेलसिंकी येथे कुस्तीत पदक मिळवले होते. तेव्हा केंद्र सरकारने ४ मे पूर्वी निर्णय घेण्याचे निर्देश कोल्हापूर सर्किट बेंचने दिले आहेत. तब्बल ७४ वर्षांनी मरणोत्तर पद्मविभूषण मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. नोव्हेंबर २०२५ मध्ये कुस्तीवीर खाशाबा जाधव



## हायकोर्टाचा केंद्र सरकारला झटका!

फाऊंडेशन याचिका दाखल केली होती. याबाबत विविध खासदारांनी देखील संसदेत मुद्दा उपस्थित केला होता. या मागणीला यश आले असून पैलवान खाशाबा जाधव यांचे सुपुत्र रणजीत जाधव यांनी आनंद व्यक्त केला आहे.नितीच्या मनात काय असतं, हे कुणाला कधी कळणार नाही. त्यांना जिवंतपणी हा पुरस्कार देता आला असता. त्यांचा मुलगा म्हणून मला वाटलं की खाशाबा जाधव यांना न्याय मिळला पाहिजे. मी गेल्या अनेक वर्षांपासून लढतोय. अनेक नेत्यांनी आम्हाला सहकार्य केलं. पैलवान लोकांनी आम्हाला सहकार्य केलं. याचिका दाखल केल्यानंतर आता सकारात्मक न्याय मिळाला. समाजातील अनेक लोकांना यातून संबोध घेता येईल की, लढता आलं पाहिजे. मला आता आशा आहे की, भारत सरकार सकारात्मक निर्णय घेईल. विलंब न लावता सरकारने याचा निकाल लागावा, अशी आशा देखील रणजीत जाधव यांनी व्यक्त केली आहे.कुस्तीपटू खाशाबा जाधव यांचा ’पद्मविभूषण’ने सन्मान व्हावा, म्हणून सरकार दरबारी दिलेली फाईल गहाळ झाल्याची धक्कादायक माहिती काही वर्षांपूर्वी समोर आली होती. २०१७ मध्ये हा प्रकार समोर आला होता. महाराष्ट्र सरकारने त्यावेळी ऑनलाईन नोंदणी प्रक्रिया करताना फाईल गहाळ झाल्याचं सांगितलं होतं. त्यानंतर रामदास तडस यांनी या प्रकरणी मुख्यमंत्र्यांना याबाबत माहिती दिली होती. तर मुख्यमंत्र्यांनी याप्रकरणी पंतप्रधानांकडे पद्मविभूषण पुरस्कारासाठी त्वरित शिफारस करणार असल्याचे आश्वासन दिले होते. पण ते आश्वसान पूर्ण न झाल्याने रणजित यांनी कोर्टाची पायरी चढली होती.

## जनसंपर्क: लोकशाहीचा पाचवा स्तंभ विषयावर आज मुंबईत विशेष संवाद

### पीआरएसआय मुंबई चॅप्टरचा उपक्रम; राज्यमंत्री श्रीमती मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या हस्ते उदघाटन

**मुंबई/प्रतिनिधी :** पब्लिक रिलेशन्स सोसायटी ऑफ इंडियाच्या (पीआरएसआय) मुंबई चॅप्टरतर्फे राष्ट्रीय जनसंपर्क दिनानिमित्त विचारमंथन व संवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. जनसंपर्क: लोकशाहीचा पाचवा स्तंभया विषयावर हा विशेष कार्यक्रम मंगळवारी (दि.२१) सायंकाळी साडेसहा वाजता आयोजित केला आहे, अशी माहिती सचिव डॉ. मिलिंद आवताडे यांनी दिली. हा कार्यक्रम नरिमन पॉइंट येथील फ्री प्रेस हाऊसच्या सभागृहात होईल. या कार्यक्रमाचे उद्घाटन राज्याच्या सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण, पाणीपुरवठा व स्वच्छता, ऊर्जा, महिला व बालविकास तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राज्यमंत्री श्रीमती मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या हस्ते होणार आहे.

कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून साम टी.व्ही.चे मुख्य संपादक डॉ. निलेश खरे, माध्यमतज्ज्ञ व संशोधक डॉ. संजय रानडे तसेच माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे संचालक डॉ. किशोर गांगुर्डे मार्गदर्शन करणार आहेत.

''जनसंपर्क आणि जनशक्ती'' या संकल्पनेला अधोरेखित करणारा हा कार्यक्रम लोकशाही व्यवस्थेमध्ये जनसंपर्काची भूमिका अधोरेखित करणार असल्याचे पीआरएसआय मुंबई चॅप्टरचे सचिव डॉ. मिलिंद आवताडे यांनी सांगितले. जनसंपर्क क्षेत्रातील व्यावसायिक, विद्यार्थी व रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## एसआरटी मुक्टा संघटनेचे उच्च शिक्षण सहसंचालकांना विविध मागण्याचे निवेदन



**लातूर/प्रतिनिधी :** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ व महाविद्यालयीन शिक्षक संघ (एसआरटी मुक्टा) संघटनेच्या वतीने डॉ.बाबासाहेब भोसले,सहसंचालक, उच्च शिक्षण विभाग, नांदेड यांना प्राध्यापकाच्या विविध मागण्याचे निवेदन देण्यात आले. विद्यापीठ क्षेत्रातील प्राध्यापकांचे विविध प्रश्न निकाली काढण्या संबंधात हे निवेदन देण्यात आले. ह्या निवेदनामध्ये महाविद्यालयीन शिक्षकांना पदोन्नतीचे लाभ देताना होणारी अडवणूक व शोषण थांबवणे, पदोन्नतीचे पूर्वी दिलेले लाभ जाणीवपूर्वक चुकीचे आहेत म्हणून थांबवणे, विषयाच्या कार्यभारा संबंधित संदिग्धता दूर करणे, सर्व महाविद्यालयातील रिक्त पद भरण्यास सरसकट परवानगी द्यावी, जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबत, २००५ पूर्वी नियुक्त शिक्षकांना जीपीएफ खाते क्रमांक देण्यात यावे, २०२० नुसार भाषा विषयाचा कमी झालेला कार्यभार पूर्वीप्रमाणे ठेवण्यात यावा, शिक्षकाचे थकीत वेतन त्वरीत द्यावेत,२७ जून २०१३ च्या शासन निर्णयानुसार सेवेचे लाभ शिक्षकांना त्वरित देण्यात यावे, सर्व महाविद्यालयात - प्रणाली लागू करावी, वैद्यकीय देयके त्वरित मंजूर करण्यात यावी. एम.फिल. चे लाभ वैद्यता प्रमाणपत्राच्या कारणास्तव थांबवण्यात येऊ नये इत्यादी विविध मागण्याचे निवेदन देण्यात आले.

या प्रलंबित मागण्याआठ दिवसात मान्य नाही झाल्या तर संघटनेच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल असे म्हणणे संघटनेच्या वतीने स्पष्ट करण्यात आले.हे निवेदन देतेवेळी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्राचार्य डॉ. सर्जेराव शिंदे, विभागीय सचिव डॉ. दीपक चाटे, उपाध्यक्ष माधव पलमंटे, समन्वयक प्राचार्य डॉ. कर्मवीर कदम, सिनेट सदस्य व नांदेड जिल्हाध्यक्ष डॉ. अविनाश शिंदे, लातूर जिल्हाध्यक्ष डॉ. भालचंद्र करंडे, लातूर जिल्हा सचिव डॉ हरिश्चंद्र चौधरी, केंद्रीय कार्यकारणी सदस्य परभणी जिल्ह्याचे डॉ. सुरेश भालेराव, डॉ. बी. सी. औचिते, डॉ. पंडित लांडगे, हिंगोली जिल्ह्यातील डॉ. कऱ्हाले, तसेच लातूर जिल्ह्यातील केंद्रीय कार्यकारणी सदस्य डॉ. डी. के. धुमाळे, विद्यापरिषद सदस्य प्रो.डॉ . नारायण कांबळे व चारही जिल्ह्यातील दीडशेच्या वर प्राध्यापक उपस्थितीत होते.

# प्रशिक्षीत कार्यकर्ता भाजपाच्या विचारधारेचा कणा

## भाजपा प्रशिक्षण शिबिर उद्घाटन प्रसंगी युवा नेते ऋषिकेश कराड यांचे प्रतिपादन





**लातूर/प्रतिनिधी :** भारतीय जनता पार्टी जगात एक नंबरचा राजकीय पक्ष आहे. कार्यकर्त्यांना शंभर टक्के न्याय देणारा एकमेव भाजपा पक्ष आहे. प्रशिक्षित कार्यकर्ता हा भाजपाचा कणा असून कार्यकर्त्याच्या मेहनतीमुळे, कष्टामुळे पक्षाने यशाची अनेक सर्वोच्च पदे प्राप्त केली आहेत असे प्रतिपादन भारतीय जनता युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष युवा नेते ऋषिकेशदादा रमेशआप्पा कराड यांनी केले.

पं. दीनदयाल उपाध्याय प्रशिक्षण महाअभियान अंतर्गत औसा तालुक्यातील भादा मंडल प्रशिक्षण वर्गाचा शुभारंभ भाजपाचे युवा नेते ऋषिकेशदादा रमेशआप्पा कराड यांच्या शुभहस्ते शनिवारी करण्यात आला. या प्रसंगी जिपच्या महिला व बालकल्याण सभापती सौ. शिवकन्याताई गोडभरले, रेणापूर पंस उपसभापती शरद दरेकर, जिप सदस्य महादेव साळुंके, प्रशिक्षण वर्ग जिल्हा सहसंयोजक रोहिदास वाघमारे, जिप सदस्या सौ. छायाताई पद्माकर चिंचोलकर, जि.प. सदस्य संदिपान शेळके, पंस सदस्या सौ. भाग्यश्री साळुंके, पंस सदस्य परमेश्वर लांडगे, भाजपा मंडल अध्यक्ष उद्धव काळे, प्रताप पाटील, सुरज शिंदे, रुपेश काळे यांची प्रमुख उपस्थिती होती. या प्रशिक्षण वर्गात ९० भाजपाच्या लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, शक्ती केंद्रप्रमुख, बूथ प्रमुखांनी सहभाग घेतला.

जनतेची सेवा करण्यासाठी भारतीय जनता पक्ष निवडणुकीना सामोरे जातो निवडणुकीतून मिळालेल्या पदाच्या माध्यमातून सर्वच लोकप्रतिनिधींनी जास्तीत जास्त जनतेची कामे केली पाहिजे त्यांच्या अडीअडचणी सोडवल्या पाहिजेत असे सांगून यावेळी बोलताना ऋषिकेशदादा कराड म्हणाले की, प्रत्येक बूथ स्तरापर्यंत भाजपा पक्षाची संघटनात्मक बांधणी मजबूत करावी पक्षाचे संघटन यशाकडे घेऊन जाण्याचा सर्वोत्तम मार्ग आहे. कार्यकर्त्यांना पक्षाची शिस्त असावी, जबाबदारीचे भान असावे यासाठी प्रशिक्षण वर्ग असल्याचे त्यांनी बोलून दाखविले.

सत्ता आली की काही जणांची नाराजी वाढते मात्र सत्तेच्या काळातही विविध कामाच्या माध्यमातून जनतेचे सेवक समजून जनतेला आनंदी ठेवण्याचे काम कार्यकर्त्यांनी करावे केंद्र आणि राज्य शासनाने गोरगरीब सर्वसामान्य जनतेच्या हिताच्या अनेक योजना सुरू केले आहे या योजनेचा लाभ गरजूंना आणि पात्र लाभार्थ्यांना मिळून देण्यासाठी भाजपाच्या कार्यकर्त्यांनी कार्यरत राहावे असेही ऋषिकेश दादा कराड यांनी बोलून दाखविले. प्रारंभी मंडल अध्यक्ष उद्धव काळे यांनी प्रास्ताविक भाषणातून मंडळातील भाजपाच्या कामाचा आढावा दिला.

या प्रशिक्षण शिबिरात वैचारिक अधिष्ठान, भाजपाचा इतिहास, कार्यपद्धती, भाजपा सरकारची कामगिरी आणि अंमलबजावणी, सोशल मीडिया यासह विविध विषयावर रोहिदास वाघमारे, सुरज शिंदे, पद्माकर चिंचोलकर, चंद्रकांत कातळे, दिलीप पाटील, नवनाथ मुरकुटे यांनी सत्रातील विषयानुसार आपले विचार मांडले.

प्रत्येक सत्रात सत्रप्रमुख म्हणून मान्यवरांची उपस्थिती होती.

## सौर कृषीपंपाबाबतच्या समस्या सोडवण्यासाठी तक्रार निवारण मेळाव्याचे आयोजन

### लाभार्थी शेतकऱ्यांनी उपस्थित राहण्याचे महावितरणचे आवाहन
### अधिकारी व सौरकृषीपंप एजन्सीचे प्रतिनिधी उपस्थित राहणार

**धाराशिव/प्रतिनिधी :** सौरकृषीपंपाबाबत येत असलेल्या तक्रारींच्या अनुशंगाने लाभार्थी शेतकऱ्यांच्या सौरकृषीपंपाबाबत असलेल्या विविध तक्रारींची दखल घेत महावितरणने सोमवार ( दि.२० एप्रिल ते २२ एप्रिल) पासून उपविभागीय कार्यालय स्तरावर तक्रार निवारण मेळाव्याचे आयोजन केले आहे. नवीन सौर कृषीपंपासाठी कसा अर्ज करायचा यासाठी तसेच सौर कृषीपंपाबाबत तक्रार असलेल्या लाभार्थ्यांनी याच लाभ घ्यावा असे आवाहन महावितरणने केले आहे.



धाराशिव शहर व ग्रामीण उप विभागांतर्गत येणाऱ्या लाभार्थ्यांसाठी तसेच कळंब उपविभागातील लाभार्थ्यांसाठी सोमवारी (दि.२० एप्रिल) उपविभागीय कार्यालयात सौरकृषीपंपाबाबतच्या तक्रारी जाणून घेवून त्याचे निवारण केले जाणार आहे. त्याचबरोबर तेर, वाशी, भूम व परंडा उप विभागातील लाभार्थ्यांसाठी मंगळवारी (दि.२१ एप्रिल) आयोजन करण्यात आले आहे. तसेच तूळजापूर विभागांतर्गत येणाऱ्या तूळजापूर, लोहारा, उमरगा व नळदुर्ग उपविभागातील लाभार्थ्यांसाठी बुधवारी (दि. २२ एप्रिल) उपविभागीय कार्यालयात तक्रारी जाणून घेवून त्याचे निवारण केले जाणार आहे.

दिनांक २० ते २२ एप्रिल दरम्यान आयोजीत तक्रार निवारण मेळाव्यास लाभार्थी सौर कृषीपंप धारक शेतकऱ्यांनी कार्यालयीन वेळेत उपस्थित रहावे. सौकृषीपंपाबाबतच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी उपविभागीय अधिकारी, शाखा प्रमुख व सौरकृषीपंप एजन्सीचे प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. शक्य तेवढ्या तक्रारिंचे निवारण जागेवरच होणार असल्याने वीजग्राहकांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन महावितरणने केले आहे.

## हिंदु खाटीक समाज आर्थिक विकास महामंडळ मर्या.विविध योजना माहिती पत्रकाचे विमोचन

**लातूर/प्रतिनिधी :** २० मार्च २०२६ रोजी महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित मुंबई उपकंपनी हिंदु खाटीक समाज आर्थिक विकास महामंडळ माहिती पत्रकाचे विमोचन व्यवस्थापकीय संचालक बाबासाहेब जी बेलदार यांच्या मार्गदर्शनाखाली महाव्यवस्थापक श्री प्रशांत जी गेडाम साहेब, यांच्या हस्ते विमोचन करण्यात आले यावेळी सहाय्यक महाव्यवस्थापक सुरेंद्र जी यावलीकर, ॲड प्रदिपसिंह गंगणे संस्थापक अध्यक्ष अखिल भारतीय संतुजी ब्रिगेड (हिंदु खाटीक युवा संघटन) यांची उपस्थिती होती. जवळपास ७०,००० माहिती पत्रके छापण्यात आली असून महाराष्ट्राच्या विविध भागात सदरची पत्रके पाठवली जाणार असून सुशिक्षित बेरोजगार युवक ,युवतीच्या आर्थिक उन्नतीसाठी समाजाच्या विविध संघटना व पदाधिकारी यांनी जिल्हा समन्वयक यांच्याशी संपर्क साधून जास्तीत जास्त समाजबांधवां पर्यंत विविध योजनाची माहिती पोहचवून प्रचार व प्रसार करण्याचे व लाभ मिळवून देण्याचे आवाहन महात्मा फुले मागासवर्ग आर्थिक विकास महामंडळ मर्यादित मुंबई कार्यालयाच्या वतीने करण्यात आले आहे

# लातूर जिल्हा बँकेकडून सर्वात मोठा 'आरोग्य जागर'

## सहकारमहर्षी दिलीपरावजी देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त ८९१६ हून अधिक नागरिकांची मोफत नेत्र तपासणी व ७६९ मोतीबिंदू शस्त्रक्रिया होणार

**लातूर/प्रतिनिधी :** काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, सहकारमहर्षी तथा माजी मंत्री दिलीपरावजी देशमुख साहेब यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या वतीने जिल्ह्यात एकाच वेळी १३ ठिकाणी भव्य मोफत नेत्र तपासणी, मोफत चष्मे वाटप व मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिराचा लातूर शहरातील आणि जिल्ह्यातील ८९१६ हून अधिक नागरिकांनी लाभ घेतला. सतर्क आरोग्य यंत्रणा, उत्तम नियोजन आणि नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग यामुळे हा सर्वात मोठा आरोग्य जागर ठरला.

ग्राहकांना उत्तम व तत्पर सेवा देण्याबरोबरच विविध सामाजिक उपक्रम राबवून लोकहिताचे कार्य करण्याची परंपरा लातूर जिल्हा बँकेने कायम ठेवली आहे. जिल्हा बँकेचे आधारस्तंभ दिलीपरावजी देशमुख साहेब यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून बँकेने शनिवार, दि. १८ एप्रिल रोजी भव्य मोफत नेत्र तपासणी, मोफत चष्मे वाटप व मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया आयोजित केले होते.





ग्रामीण भागातील सर्वसामान्य नागरिक आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना दर्जेदार आरोग्य सेवा मिळावी, या उद्देशाने जिल्हा बँकेचे अध्यक्ष श्री. धिरज विलासराव देशमुख साहेब यांच्या संकल्पनेतून या आरोग्य शिबिराचे नियोजन करण्यात आले होते. जिल्ह्यात १३ ठिकाणी सकाळी ९ वाजल्यापासून शिबिराला सुरवात झाली. ग्रामीण भागात सायंकाळी उशिरापर्यंत शिबिर सुरू होते. अनेक तज्ञ डॉक्टर, परिचारिका या शिबिरात उपचारासाठी सहभागी झाल्या होत्या.

ग्रामीण रुग्णालय बाभळगाव, सार्वजनिक स्टेज सभागृह बोरगाव काळे, माता रमाई आंबेडकर रुग्णालय सम्राट चौक लातूर, पांडुरंग मंगल कार्यालय दिपज्योती नगर लातूर, बाजार समिती सभागृह रेणापूर, यादव मंगल कार्यालय बेलकुंड, जिजाऊ चौक निलंगा, बिराजदार नेत्र रूग्णालय शाहू चौक उदगीर, विठ्ठल रुक्मिणी मंदिर सभागृह तिरुका, ग्रामीण रुग्णालय अहमदपूर, ग्रामीण रुग्णालय चाकूर, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक परिसर शिरूर अनंतपाळ, बोरोळ चौक देवणी येथे शिबिर संपन्न झाले. या प्रत्येक ठिकाणी नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. अशा प्रकारचे उपक्रम यापुढेही राबवले जातील असे जिल्हा बँकेचे अध्यक्ष श्री. धिरज विलासराव देशमुख साहेब यांनी सांगितले.

**समाजाप्रती बांधिलकी जपणारा हा उपक्रम: सहकारमंत्री बाबासाहेब पाटील**

ग्रामीण रुग्णालय, अहमदपूर येथे माजी मंत्री श्री. दिलीपरावजी देशमुख साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित मोफत नेत्र तपासणी शिबिरास उपस्थित राहून सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी नागरिकांशी संवाद साधला. समाजहित जपणारे आणि सर्वसामान्यांच्या आरोग्याची काळजी घेणारे असे उपक्रम निश्चितच प्रेरणादायी आहेत. या शिबिराच्या माध्यमातून अनेक गरजू नागरिकांना नेत्र तपासणी व उपचारांचा लाभ मिळत असून, आरोग्यसेवेच्या माध्यमातून समाजाप्रती बांधिलकी जपण्याचे कार्य या उपक्रमातून दिसून येते, असे सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांनी सांगितले.

मोतीबिंदू निदान झालेल्या रुग्णांची आरोग्य तपासणी करून शस्त्रक्रियेसाठी पात्र असणाऱ्या रुग्णांच्या शस्त्रक्रिया टप्प्याटप्प्याने मोफत केल्या जातील असे आयोजकांकडून सांगण्यात आले आहे.

**नेत्र तपासणी शिबिरातील रुग्णसंख्या**

- तज्ज्ञ डॉक्टरांकडून डोळ्यांची मोफत तपासणी : ८९१६
- तपासणीनंतर गरजूंना मोफत चष्म्यांचे वाटप : ५३३९
- मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया : ७६९

## शिक्षण संस्थाचालक संघाच्या शिबिरात १५१ जणांचे रक्तदान

**लातूर/प्रतिनिधी :** सहकार महर्षी, माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्या ७६व्या वाढदिवसानिमित्त लातूर जिल्हा शिक्षण संस्थाचालक संघाच्यावतीने शनिवारी आयोजित करण्यात आलेल्या शिबिरात १५१ जणांनी रक्तदान केले. यानिमित्त १५१ अंधजणांना कपडेही वाटप करण्यात आले.



शहरातील नवीन जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ असलेल्या साने गुरुजी विद्यालयात झालेल्या या शिबिराचे उद्घाटन महापौर जयश्री सोनकांबळे यांच्या हस्ते दीप प्रज्ज्वलन करून झाले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून प्रसिध्द छातीविकार तज्ज्ञ डॉ. रमेश बराटे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी महापौर सोनकांबळे म्हणाल्या, रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे. सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त जिल्हा शिक्षण संस्थाचालक संघाच्यावतीने आयोजित करण्यात आलेले हे शिबिर व अंधजणांना कपडे वाटपाचा उपक्रम स्तुत्य असल्याचे गौरवोद्गारही त्यांनी काढले. यावेळी अन्य मान्यवरांचीही समायोजित भाषणे झाली.

कार्यक्रमास लातूर जिल्हा शिक्षण संस्थाचालक संघाचे अध्यक्ष रामदास पवार, सचिव प्राचार्य बाबूराव जाधव, कोषाध्यक्ष प्राचार्य डी. एन. केंद्रे, कार्याध्यक्ष डी. बी. लोहारे, सरचिटणीस प्रा. गोविंदराव घार, उपाध्यक्ष जे. जी. सगरे, सहसचिव पी. एन. बंडगर, वसंतराव पाटील, प्रकाश देशमुख, कालिदास माने, सदस्य एम. एस. पात्रे, कमलाकर शिंदे, पंडित कदम, व्यंकटराव शिंदे, सी. के. साळुंके, जितेंद्र स्वामी, रणजीत बेल्लाळे, बाळासाहेब पाटील झरीकर, एकनाथ पाटील, प्रा. दिलीप गुंजरगे, भालचंद्र सोनकांबळे यांच्यासह अन्य सदस्य व मान्यवर उपस्थित होते.




# सचिन पिळगांवकर आणि मधुराणी गोखले सोबत एका अनोख्या हिरोची मराठी सिनेसृष्टीत दमदार एंट्री

**लातूर/प्रतिनिधी :** चंदेरी दुनियेत ब्रेक मिळायला अनेक ऑडिशन्स द्याव्या लागतात. पण हा असा पहिला कलाकार आहे ज्याला ऑडिशन्स न देता थेट सुप्रसिद्ध अभिनेते सचिन पिळगांवकर आणि सुप्रसिद्ध अभिनेत्री मधुराणी गोखले यांच्यासोबत चित्रपटात काम करण्याची लॉटरी लागली आहे ते पण हिरो म्हणून. कोण आहे हा हिरो ? या हिरोच नाव आहे कापूसकोंडा. हा एक गोंडस भुभु - कुत्रा आहे. आणि हेच या चित्रपटाचे मुख्य आकर्षण आहे. आज अक्षय्य तृतीयेच्या शुभमुहूर्तावर कापूसकोंडा' या चित्रपटाचे मोशन पोस्टर सोशल मीडियावर लाँच करण्यात आले आहे. नवरा माझा नवसाचा या गाजलेल्या चित्रपटात अभिनेते सचिन पिळगांवकर आणि अभिनेत्री मधुराणी गोखले दिसले होते. आता तब्बल २२ वर्षांनंतर कापूसकोंडा या आगामी चित्रपटातून पुन्हा एकदा एकत्र आले असून, बऱ्याच काळानंतर या चित्रपटाच्या निमित्ताने अभिनेत्री मधुराणी गोखले चित्रपटात कमबॅक करत आहे.

जास्वंद एंटरटेन्मेंट्स प्रा. लि. निर्मित कापूसकोंडा चित्रपटाचे लेखन आणि दिग्दर्शन सचिन मोहिते यांचं आहे. सचिन मोहिते, गणेश पंडित, ऋषिकेश तुरई यांनी चित्रपटाची पटकथा, संवादलेखन केलं आहे. सचिन पाटेकर यांनी छायांकनाची जबाबदारी निभावली आहे. संगीतकार ए. व्ही. प्रफुल्लचंद्र यांचे सुमधुर संगीत या चित्रपटाला लाभले असून चित्रपटाच्या गाण्यांना गायक अवधूत गुप्ते, पद्मनाभ गायकवाड यांचा स्वरसाज लाभला आहे. सुहास राणे यांनी ध्वनी तंत्रज्ञ म्हणून काम पाहिले आहे. अभिनेते सचिन पिळगांवकर व अभिनेत्री मधुराणी गोखले यांच्यासह नवीन पिढीतील अभिनेत्री अक्षता पाडगांवकर, जान्हवी तांबट आणि अभिनेता भूषण पाटील अशी उत्तम स्टारकास्ट या चित्रपटात पहायला मिळणार आहे. चित्रपटाचे बरेचसे चित्रीकरण कथानकाची गरज समजून लातूर जिल्ह्यातील अंधोरी या गावी करण्यात आले आहे.



कापूसकोंडा चित्रपटाची कथा अत्यंत अनोखी आहे. विशेष म्हणजे चित्रपटाची कथा एका सत्य घटनेवर प्रेरित आहे. चित्रपटाचा खरा हिरो हा पोस्टरवर दिसत असलेला एक 'कुत्रा' असून चित्रपटाचे रंजक कथानक हे एका फॅमिली आणि त्या कुत्र्याच्या भोवती गुंफण्यात आले आहे. मानवी नाते संबंध, कुटुंब, भाव-भावनांवर आधारित ही हळवी गोष्ट प्रत्येकाला आपलीशी वाटणारी आहे. म्हणूनच या चित्रपटाला ए फॅमिली डॉग फिल्म अशी टॅग लाईन देण्यात आली आहे. लेखक, दिग्दर्शक सचिन मोहिते या पुढे मराठीत पहिल्यांदाच एक 'डॉगव्हर्स करण्यास उत्सुक आहेत, कामही सुरु आहे.




या चित्रपटाचं कथानक हे अतिशय वेगळे आहे. इतक्या वर्षांच्या माझ्या कारकिर्दीत असे कथानक मी कधी केले नाही. माझ्या भावनानसोबत या चित्रपटाचे कथानक मिळते जुळते असल्याचे मला जाणवले. त्याचप्रमाणे या चित्रपटाचा लेखक, दिग्दर्शक सचिन मोहिते हा मला पहिल्या भेटीतच कमालीचा हुशार वाटला आणि त्याच्यावर विश्वास ठेऊन मी या चित्रपटात काम करण्यासाठी होकार दिला असे सुप्रसिद्ध अभिनेते सचिन पिळगांवकर यांनी सांगितले. चित्रपटाचे लेखक, दिग्दर्शक सचिन मोहिते सरांनी चित्रपटाची कथा जेव्हा मला ऐकवली तेव्हाच मी या कथेच्या प्रेमात पडली. इतकी गोड, निरागस अशी ही कथा ऐकताना माझ्या मनाला भिडली सोबत वेगळी भूमिका करण्याची संधी मला मिळाली यासाठी मी या चित्रपटात काम करण्याचा निर्णय घेतला. कथानक खुपच वेगळ्या धाटणीचं असुनही अगदी सहजपणे मांडलं आहे. सोबत सचिन पिळगांवकर सरांसोबत काम करण्याची मला संधी २२ वर्षांनी मिळणार होती.सचिन सरांसोबत काम करताना अनेक गोष्टी मला शिकायला मिळाल्या असे अभिनेत्री मधुराणी गोखले यांनी सांगितले. उत्तम कथानकाला तितक्याच सक्षम अभिनयाची जोड असल्यानं हा चित्रपट मनोरंजनाची पर्वणी ठरणार आहे परंतु त्यासाठी अजून प्रेक्षकांना थोडी प्रतीक्षा करावी लागणार असून लवकरच चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीख जाहीर करण्यात येणार आहे, तेव्हा भेटूया कापूसकोंड्याला लवकरच आपल्या जवळच्या चित्रपटगृहात.

## महिला सक्षमीकरणासाठी महत्त्वाचे पाऊल; विलासराव देशमुख फाउंडेशनतर्फे
# प्रभाग क्र १७ मधील ७३ महिलांना शिलाई प्रशिक्षण प्रमाणपत्र प्रदान

**लातूर/प्रतिनिधी :** विलासराव देशमुख फाउंडेशनच्या वतीने प्रभाग क्र. १७ मधील तुळजाभवानी नगर येथे सुरू करण्यात आलेल्या मोफत शिलाई प्रशिक्षण केंद्राचा यशस्वी समारोप सोहळा नुकताच उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमात प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण करणाऱ्या ७३ महिलांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री, महाराष्ट्र विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाने आणि ट्वेंटीवन ग्री लि.च्या संचालिका सौ.अदिती अमित देशमुख यांच्या पुढाकारतून हे प्रशिक्षण केंद्र चालवण्यात आले होते.



महिलांना स्वतःच्या पायावर उभे राहता यावे आणि स्वयंरोजगाराची संधी मिळावी,या उद्देशाने फाउंडेशनने हा उपक्रम सुरू केला आहे. या केंद्रात महिलांना ३ महिन्यांचे व्यावसायिक शिलाई प्रशिक्षण देण्यात आले.या प्रशिक्षणात शिलाईच्या विविध पद्धती,डिझाइनिंग आणि कटिंग यांसारख्या विषयांचे सखोल ज्ञान देण्यात आले.

प्रशिक्षक क्रांती उफाडे यांच्या मार्गदर्शनाखाली या ७३ महिलांनी शिलाई कामातील सर्व कला आणि कौशल्ये आत्मसात केली.

या माध्यमातून प्रशिक्षण पूर्ण केलेल्या महिलांचा प्रमाणपत्र वितरण सोहळा नुकताच उत्साहात पार पडला.या कार्यक्रमाला विलासराव देशमुख फाउंडेशनच्या विभाग प्रमुख संगीता मोळवणे,माजी उप सरपंच अविनाश देशमुख,कविता वाडीकर,प्रवीण सूर्यवंशी-समन्वयक सोशल मीडिया प्रमुख,अभिषेक देशमुख,साक्षी घोटाळे,श्रीशैल्य गडगडे,काँग्रेस आध्यात्मिक आघाडीचे अध्यक्ष-अॅड.शरद देशमुख,श्री. वाडीकर सर,प्रशिक्षक-क्रांती उफाडे,गजानन बोयणे,सोमनाथ कावळे यांच्यासह प्रशिक्षणार्थी महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

**जाहीरनामा**

**श्रीमती एम.एस. निकम, १० वे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, लातूर यांच्या न्यायालयात**

वारसा प्रमाणपत्र क्र. ५६२/२०२६
सविता वि. निरंक
निशाणी क्रमांक ०६

ज्यापेक्षा मयत **त्र्यंबकअप्पा करबसअप्पा हासाळे,** यांचा दिनांक २४.०४.२०२२ रोजी **लातूर, ता.जि. लातूर** येथे मृत्यू झाला. उपरोक्त प्रकरणात अर्जदार **१) सविता भ्र. त्र्यंबकअप्पा हासाळे, वय ५४ वर्षे, २) सुमित त्र्यंबकअप्पा हासाळे, वय २९ वर्षे, ३) स्वप्नील त्र्यंबकअप्पा हासाळे, वय २९ वर्षे, सर्व रा. पटेल चौक, लातूर** यांनी मयत **त्र्यंबकअप्पा करबसअप्पा हासाळे** यांचे वारस असलेबाबत या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

अर्जदार यांनी उपरोक्त प्रकरणात मयत **त्र्यंबकअप्पा करबसअप्पा हासाळे** यांच्या मृत्यूपश्चात अर्जदार यांना मयताचे कायदेशीर वारस घोषीत करुन तसेच वारसाचे प्रमाणपत्र सरकारी व निमसरकारी कार्यालयात अर्जदाराचे नांव नोंदणी करण्यासाठी व ईतर कामासाठी त्यांच्या हक्कामध्ये वारसाचे प्रमाणपत्र मिळावे म्हणून अर्ज केला आहे.

त्यापेक्षा उपरोक्त अर्जदार हे मयताचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर हा जाहीरनामा प्रसिद्ध झालेल्या तारखेपासून एक महिण्याच्या आत या कोर्टात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात. या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर उपरोक्त मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदारास सदरहू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

**आज तारीख** २०.०४.२०२६
**पुढील तारीख** ११.०६.२०२६

आदेशावरून

स्वाक्षरित/-
**एम.डी. सुर्यवंशी**
**क. लिपीक**

कोर्ट शिक्का

स्वाक्षरित/-
**सहा अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय**
**व. स्तर लातूर**

**प्रभात किरणे**

**नाती मैत्री**
**असावी ऊसासारखी**
**पिळले, कुटले, बारीक**
**केले तुकडे तरीही स्वधर्म**
**गोडच गोड,न सोडे**
**नाथा नागनाथ**
**तुझंही हेच आवडे**
**-इंजि. नागनाथ कलवले लातूर**
**९१-९७६४७ ८८२८८**

# म.बसवेश्वर महाविद्यालयातील डॉ.सुजित हांडीबाग यांना 'लेफ्टनंट' रँक

## नागपूर येथील प्रशिक्षणात डीजीएनसीसी लेफ्टनंट जनरल वीरेंद्र वत्स यांच्याशी एनसीसी सक्षमीकरणावर साधला संवाद



**लातूर/प्रतिनिधी :** महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील गणित विभाग प्रमुख आणि एन.सी.सी. अधिकारी डॉ. सुजित सुरेश हांडीबाग यांनी कामठी (नागपूर) येथील प्रतिष्ठित 'ऑफिसर्स ट्रेनिंग अकॅडमी' मध्ये ९० दिवसांचा 'पीआरसीएन' (झठउछ) कोर्स यशस्वीरित्या पूर्ण केला आहे. या यशाबद्दल त्यांना भारतीय लष्करी परंपरेनुसार एन.सी.सी. मध्ये 'लेफ्टनंट' ही मानाची रँक प्रदान करण्यात आली आहे.

या प्रशिक्षण कालावधीत १९ मार्च २०२४ रोजी डीजीएनसीसी लेफ्टनंट जनरल वीरेंद्र वत्स यांनी अकॅडमीला भेट दिली. यावेळी डॉ.सुजित हांडीबाग यांनी त्यांच्याशी थेट संवाद साधत, महाविद्यालय आणि एन.सी.सी. युनिटमधील महत्त्वाचा दुवा असलेल्या 'असोसिएट एन.सी.सी. ऑफिसर' या पदाला अधिक मजबूत करण्याबाबत आणि सध्याच्या तांत्रिक युगात येणाऱ्या अडचणींबाबत प्रदीर्घ चर्चा केली. या महत्त्वपूर्ण चर्चेची दखल घेत 'ओटीए कामठी' ने आपल्या अधिकृत ट्विटर (द) हँडलवरून या भेटीचा व्हिडिओ आणि फोटो प्रसिद्ध केला आहे.

देशभरातील ५१३ प्रशिक्षणार्थींमधून आपली वेगळी ओळख निर्माण करत डॉ.हांडीबाग यांनी शारीरिक आणि मानसिक दृष्टिकोनातून अत्यंत 'टफ' मानला जाणारा हा ९० दिवसांचा कोर्स पूर्ण केला. प्रशिक्षणाच्या शेवटच्या दिवशी झालेल्या 'पासिंग आऊट परेड' मधील त्यांचा उत्साह पाहून उपस्थितांनी त्यांचे कौतुक केले. हा ९० दिवसांचा प्रवास केवळ प्रशिक्षणाचा नसून तो व्यक्तिमत्त्व परिवर्तनाचा होता, संपूर्ण देशाशी संवाद साधण्याची ही संधी माझ्यासाठी भाग्याची ठरली. हा ९० दिवसांचा कोर्स शारीरिक आणि मानसिक दृष्टिकोनातून अत्यंत खडतर होता. पहाटेपासून रात्री उशिरापर्यंत चालणारा दिनक्रम, शिस्तबद्ध कवायती आणि लष्करी प्रशिक्षणाने प्रत्येक अधिकाऱ्याच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडवून आणला आहे. कुटुंबापासून तीन महिने लांब राहून हे प्रशिक्षण पूर्ण करणे आव्हानात्मक होते, मात्र येथून मिळालेला अनुभव ही आयुष्यभराची शिदोरी ठरेल, अशा भावना नवनियुक्त लेफ्टनंट डॉ. सुजित हांडीबाग यांनी व्यक्त केल्या. या कोर्समुळे त्यांना संपूर्ण देशातील विविध राज्यांतील अधिकाऱ्यांशी संवाद साधण्याची आणि भारतीय संस्कृती जवळून अनुभवण्याची संधी मिळाली.

त्यांना मिळालेल्या 'लेफ्टनंट' या मानाची रँक बद्दल महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आदिनाथ सांगवे, उपाध्यक्ष माधवराव पाटील तपसेचिंचोलीकर, सचिव माधवराव पाटील टाकळीकर, सहसचिव सुनील मिटकरी, कोषाध्यक्ष विजयकुमार रेवडकर, कार्यकारी संचालक प्रदीप दिंडेगावे आणि सर्व सन्माननीय संस्था पदाधिकारी, प्राचार्य, मुख्य समन्वयक, उपप्राचार्य, पर्यवेक्षक, कनिष्ठ आणि वरिष्ठ महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी अभिनंदन केले आहे.

**फोन खुणा..**

भय वाटे आजकाल
फोन करतानां कुणा
सीडीआर मध्ये दिसे
स्पष्ट सगळ्यां खुणा

फोन केलेली व्यक्ती
कधीकाही करे गुन्हा
झेंगाट ना लागो मागे
आपल्या बाबा पुन्हा

माहितीचा अधिकार
सतावतो काहीम्हणा
तयार ब्रेकिंगबातम्यां
फोनकेले कितीजणा

वैरी झाला सेल फोन
उगा वाजे खणाखणा
अफवा बोंबाट करती
जगा सांगत दणादणा

चौकशीबाई ससेमिरा
गा दिसेल तिथे खणा
लोकांना हवायविषय
लगेचकरे खाणाखुणा

पोलिसस्टेशनहेलपाटे
पार मोडून पाडे कणा
आम्ही नाय साथीदार
आरसा दावा काकणा

स्वच्छ असून चारित्र्य
कपाळी अपराधीपणा
जेलमध्ये ते आरामात
मन स्ताप का आपणा

**– हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६

## ८३३ वी महात्मा बसवेश्वर जयंती उत्साहात साजरी

**उदगीर/प्रतिनिधी :** येथील आनंदनगर, कापड मार्केट परिसरातील ओंकारेश्वर मंदिरातील वाचनालयात जगज्योती महात्मा बसवेश्वर यांची ८३३ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमात श्रीपती केंद्रे यांच्या हस्ते महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**ई-खरेदी सूचना**

विभागीय भांडार कार्यालय मध्य रेल्वे, सोलापूर आणि मा.भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने, खालील कामांसाठी सक्षम व प्रतिष्ठित संस्था/कंत्राटदारांकडून रेल्वेच्या ई-खरेदी संकेतस्थळा **www.ireps.gov.in** वर ऑनलाईन ई-निविदा आमंत्रित केल्या जात आहेत. **निविदा क्रमांक:** ९६२६५०११इ, **तपशील:** वस्तू - इलास्टिक रेल क्लिप्स MK-V चे उत्पादन व पुरवठा; या क्लिप्स RDSO रेखाचित्र क्र. T5919 Alt-2 आणि ERC साठीच्या IRS विनिर्देश क्र. T-31-2021 - पाचवी आवृत्ती (सुधारणा-२ व नवीनतम बदल समाविष्ट) यांनुसार असणे आवश्यक आहे. **प्रमाण:** १२०८४६ नग, **अनामत रक्कम (INR)**: रु. २,४१,४७०/-, **www.ireps.gov.in** वर **निविदा सादर करण्याची अंतिम तारीख व वेळ:** ३०.०४.२०२६ रोजी ११:३० नंतर. इच्छुक निविदाकारांना असा सल्ला दिला जातो की, निविदा सादर करण्याच्या अंतिम तारखेपूर्वी त्यांनी या निविदेसंदर्भात जारी केलेले कोणतेही बदल/शुद्धिपत्रक पाहण्यासाठी संकेतस्थळाला वारंवार भेट द्यावी. संकेतस्थळ: **www.ireps.gov.in.**

**वरिष्ठ विभागीय सामग्री व्यवस्थापक**
**DE/Sur-16** **मध्य रेल्वे, सोलापूर**

सुरक्षित प्रवास करा,
फूटबोर्डवरून प्रवास करणे टाळा.

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**ई-खरेदी सूचना**

विभागीय भांडार कार्यालय, मध्य रेल्वे, सोलापूर आणि मा.भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने खालील कामांकरिता सक्षम व प्रतिष्ठित संस्था/कंत्राटदारांकडून रेल्वेच्या ई-खरेदी संकेतस्थळा **www.ireps.gov.in** वर ऑनलाईन ई-निविदा आमंत्रित करत आहे. **निविदा क्रमांक:** 96265021-, **तपशील:** वस्तू - RDSO च्या प्रमाणित रेखाचित्र क्रमांक T-6441 (Alt-4) नुसार निविदा बंद होण्याच्या दिनांकापर्यंतच्या अद्ययावत सुधारणांसह, PSC स्लीपर्सवर बसवल्या जाणाऱ्या '1 in 8.5 BG 60KG Weldable CMS Crossing' चे उत्पादन आणि पुरवठा करणे; यामध्ये सदर '1 in 8.5 BG 60Kg Weldable CMS Crossing' साठी ६ मिमी जाडीच्या, नायलॉन कॉर्डने प्रबलित GRSP च्या पुरवठ्याचाही समावेश आहे (तपशील परिशिष्ट-A मध्ये जोडलेले आहेत). **प्रमाण:** २५ संच, **अनामत रक्कम** (INR): रु. १,९४,११०/-, www.ireps.gov.in वर **निविदा बंद होण्याची तारीख व वेळ:** २७.०४.२०२६ रोजी ११:३० नंतर. इच्छुक निविदाकारांना असा सल्ला दिला जातो की, निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी त्यांनी सदर संकेतस्थळाला वारंवार भेट द्यावी, जेणेकरून या निविदेसंदर्भात जारी केलेले कोणतेही बदल/शुद्धिपत्रक त्यांच्या निदर्शनास येतील. संकेतस्थळ: **www.ireps.gov.in.**

**वरिष्ठ विभागीय सामग्री व्यवस्थापक**
**DE/Sur-17** **मध्य रेल्वे, सोलापूर**

सुरक्षित प्रवास करा,
फूटबोर्डवरून प्रवास करणे टाळा.

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**ई-खरेदी सूचना**

विभागीय भांडार कार्यालया मध्य रेल्वे, सोलापूर आणि मा. भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने, खालील कामांसाठी सक्षम व प्रतिष्ठित संस्था/कंत्राटदारांकडून रेल्वेच्या ई-खरेदी संकेतस्थळा **www.ireps.gov.in** वर ऑनलाईन ई-निविदा आमंत्रित केल्या जात आहेत. **निविदा क्रमांक:** ९६२६५०५४, **तपशील:** 1. RDSO रेखाचित्र क्र. T-3911 नुसार, डॉवेल्ससह वापरण्यासाठी गॅल्व्हनाइज्ड प्लेट स्क्रूचे उत्पादन व पुरवठा. **प्रमाण:** ११६३० नग. 2. SEJ साठी प्लेट स्क्रूचे उत्पादन व पुरवठा (रेखाचित्र क्र. T-3916). **प्रमाण:** ९७५० नग. 3. RDSO रेखाचित्र क्र. T-3912 नुसार, डॉवेल्ससह वापरण्यासाठी गॅल्व्हनाइज्ड प्लेट स्क्रूचे उत्पादन व पुरवठा. **प्रमाण:** ५०००० नग. 4. RDSO रेखाचित्र क्र. T-3915 नुसार, डॉवेल्ससह वापरण्यासाठी गॅल्व्हनाइज्ड प्लेट स्क्रूचे उत्पादन व पुरवठा. **प्रमाण:** ५०००० नग. 5. RDSO रेखाचित्र क्र. T-3913 नुसार, डॉवेल्ससह वापरण्यासाठी गॅल्व्हनाइज्ड प्लेट स्क्रूचे उत्पादन व पुरवठा. **प्रमाण:** १०००० नग. **अनामत रक्कम** (INR): रु. १,६०,६००/-. **www.ireps.gov.in** वर **निविदा बंद होण्याची तारीख व वेळ:** २९.०४.२०२६ रोजी ११:३० नंतर. इच्छुक निविदाकारांना असा सल्ला दिला जातो की, निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी या निविदेसंदर्भात जारी केलेले कोणतेही बदल/शुद्धिपत्रक पाहण्यासाठी त्यांनी संकेतस्थळाला वारंवार भेट द्यावी. संकेतस्थळ: **www.ireps.gov.in.**

**वरिष्ठ विभागीय सामग्री व्यवस्थापक**
**DE/Sur-18** **मध्य रेल्वे, सोलापूर**

सुरक्षित प्रवास करा,
फूटबोर्डवरून प्रवास करणे टाळा.

सार्बांवि
राष्ट्राच्या सेवेत

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक बांधकाम विभाग**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय**
**सार्वजनिक बांधकाम विभाग लातूर**
**बांधकाम भवन राजीव गांधी चौक नविन औसा रोड लातूर**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**दुरध्वनी-** ०२३८२/२००८६८ e mail latur.ee mahapwd.gov.in **फॅक्स**०२३८२/२००१४७

### ई-कोटेशन सुचना क्र pwdlatur-01/2026-27 (द्वितीय वेळ)

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, लातूर Providing Furniture & Related Allied Works for District Project Officers Office, DPDC Hall Guarden Minsiter Office at Latur Tq.Dist.Latur. या कामाकरीता ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) ई-कोटेशन मागवित आहोत. कोटेशन कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथुन डाऊनलोड करण्यात यावी. तसेच कोटेशन स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, लातूर यांनी राखुन ठेवला आहे. अट असलेली कोटेशन स्विकारली जाणार नाही.

ई-कोटेशन डाऊनलोड करण्याचा कालावधी दिनांक **२१.०४.२०२६ ते २४.०४.२०२६. रोजी ११.००** वाजेपर्यंत राहील. डाऊनलोड केलेले कोटेशन दिनांक **२४.०४.२०२६ रोजी ११.००** वाजेपर्यंत ऑनलाईन स्विकृत केल्या जातील व **दि. २५.०४.२०२६ रोजी ११.३०** वाजेपर्यंत उघडण्यात येतील.

स्वाक्षरित/-
**कार्यकारी अभियंता,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, लातूर**

**अटी :-**

१ खालील संकेतस्थळावर ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.
http://mahapwd.com, http://mahatenders.gov.in
(सदर निविदेमध्ये काही बदल होत असल्यास वरिल वेबसाईटवरती कळविण्यात येईल व कार्यालयीन नोटीस बोर्डवर डकवण्यात येईल)
२ निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी http://mahatenders.gov.in या Portal वर enrolled करावे.
३ काही शंका असल्यास 24 x 7 Help Desk Toll Free No. १८०० ३०७० २२३२ Mobile No. +९१७८७८१०७९८५/८६, +९१ ७८७८००७९७२/७३ ई-मेल: eproc.maharashtra@gmail.com, cppp-support@nic.in वर संपर्क साधावा.
४ कोणत्याही किंवा सर्व कामाच्या निविदा, कोणतेही कारण न देता दद्य करण्याचा अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवला आहे.
५ निविदा ऑनलाईन सादर करावयाच्या प्रक्रियेत कोणत्याही कारणामुळे अडथळा आल्यास त्यास हे कार्यालय जबातदार राहणार नाही.

**विमाका/लातूर/जाहि०९/२०२६-२७**

Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26
हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी-५२/२४-२६